cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९२ | बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### रस्त्यावरची राजकारणशैली आणि लोकशाहीची पडझड

पुण्यात दोन राष्ट्रीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी ही केवळ स्थानिक पातळीवरील घटना म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. ती आपल्या राजकीय संस्कृतीच्या अधोगतीचे जिवंत उदाहरण आहे. ज्या पक्षांनी देशव्यापी नेतृत्वाचा दावा केला, लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची शपथ घेतली आणि सामाजिक परिवर्तनाचे घोषवाक्य दिले.

## थोडक्यात...

### दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले–सुप्रिया

दिल्लीः राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या मुद्यावर सुप्रिया सुळेंना माध्यमांनी प्रश्न विचारला असता, सुप्रिया सुळे यांनी दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले. माझा भाऊ राहिला नाही. त्यामुळे आता त्या चर्चांना काही अर्थ उरत नाही, असे स्पष्ट करत विलीनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी या प्रकरणी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांना मुंढवा जमीन प्रकरणाच्या अहवालावर प्रश्न विचारला असता, अहवाल वाचल्याशिवाय त्यावर भाष्य करणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुप्रिया सुळे यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांचीही पाठराखण केली. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणाही साधला.

### लाच प्रकरणाची पोलिस उपायुक्तांमार्फत चौकशी

मुंबई : मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागात १२ फेब्रुवारीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) धाड टाकली. यात दोघा जणांना लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात घडलेल्या या प्रकाराने खळबळ उडाली. अटक करण्यात आलेली व्यक्ती राजेंद्र ढेरंगे हे अन्न व औषध प्रशासन विभागात लिपिक पदावर कार्यरत आहे. त्याला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरानंतर मंत्री झिरवाळ यांनी विभागामार्फत चौकशीचे आदेश दिले आहेत. पोलीस उपायुक्तांमार्फत ही चौकशी केली जाणार असल्याचे झिरवाळ यांनी मंगळवारी १७ फेब्रुवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

### बलाढ्य ऑस्ट्रेलिया वर्ल्ड कपमधून बाहेर

दिल्लीः टी–२० विश्व कप २०२६ मध्ये ग्रुप बी मधून सर्वात मोठा आणि धक्कादायक उलटफेर पाहायला मिळाला आहे. या गटात ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, झिम्बाब्वे, आयर्लंड आणि ओमान हे संघ स्पर्धेत होते. दुबळ्या समजल्या जाणाऱ्या झिम्बाब्वेने पूर्वविजेते ऑस्ट्रेलियाला पराभूत केले. ज्याने संपूर्ण गटाचे गणित बदलून टाकले. त्यानंतर श्रीलंकेनेही ऑस्ट्रेलियाला पराभूत करून कांगारूंची स्थिती आणखी खराब केली. ऑस्ट्रेलियाला आता फक्त शेवटच्या सामन्यात मोठ्या फरकाने विजय मिळवावा लागणार होता आणि त्याचवेळी झिम्बाब्वे उर्वरित सामन्यात पराभूत व्हावे लागणार होते. मात्र, ऑस्ट्रेलियाच्या या आशेवर पाणी फेरले गेले कारण झिम्बाब्वे विरुद्ध आयर्लंड हा महत्त्वाचा सामना पूर्णपणे पावसामुळे रद्द झाला. पल्लेकेले स्टेडियमवर संपूर्ण दिवस पाऊस पडत राहिला आणि कटऑफ वेळ (संध्याकाळी ६.१० वाजेपर्यंत) ओलांडली गेली. पंचांनी दोन्ही कर्णधारांशी चर्चा केल्यानंतर सामना ड्रॉ घोषित केला. यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण मिळाला. यामुळे झिम्बाब्वेचे ५ गुण झाले आणि ऑस्ट्रेलियाला बाहेर पडावे लागले. तर झिम्बाब्वे सुपर आठमध्ये पोहोचले.

### मथुरेत पहिले 'राष्ट्रीय गाय संस्कृती संग्रहालय'

मथुराः उत्तरप्रदेशमध्ये देशातील पहिले राष्ट्रीय गाय संस्कृती संग्रहालय उभे राहणार आहे. मथुरा येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय पशुवैद्यकीय विज्ञान विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये हे संग्रहालय स्थापन केले जाईल. उत्तर प्रदेश ब्रज तीर्थ विकास परिषदेच्या पुढाकाराने उभारल्या जाणाऱ्या या संग्रहालयासाठी जमीन देखील निश्चित करण्यात आली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ३२.०० क्विंटल** | | |
| २,१५१ | ३,४५० | २,४७७ |
| **ज्वारी/हायब्रिड :२७.०० क्विंटल** | | |
| २,३०० | ४,३५१ | ३,५०५ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर : ९.०० क्विंटल** | | |
| ७,२०१ | ७,८५० | ७,६७४ |
| **उडीद : ७.०० क्विंटल** | | |
| ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| **बाजरी: ११.५० क्विंटल** | | |
| २,०५० | ३,११६ | २,७३७ |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| **सोयाबीन: ५४.०० क्विंटल** | | |
| ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| **हरभरा: ८.५० क्विंटल** | | |
| ४,५०० | ५,२०० | ४,७६६ |

# ४५ साखर कारखान्यांना थकीत एफआरपीसाठी नोटीसा!

## चार कारखान्यांचा शेतकऱ्यांचा एक रुपयाही नाही, दोन दिवस सुनावणी

पुणे । प्रतिनिधी

**साखर कारखान्यांनी गाळपासाठी शेतकऱ्यांचा ऊस तोडल्यानंतर १४ दिवसांच्या आत रास्त आणि किफायतशीर किंमत अर्थात एफआरपी देणे अपेक्षित असतानाही राज्यातील ४५ साखर कारखान्यांनी अजूनही ६० टक्के एफआरपी दिलेली नाही. चार कारखान्यांनी शेतकऱ्यांचा एक रुपयाही दिलेला नाही. त्यामुळे साखर आयुक्तालयाने संबंधित कारखान्यांना नोटिसा बजावल्या असून, दोन दिवस सुनावणी घेण्यात येणार आहे.**



थकबाकी न दिल्यास कारखान्यांविरोधात महसूल वसुलीची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. या साखर कारखान्यांकडे सुमारे १ हजार ८६० कोटी रुपयांएवढी रक्कम थकीत असल्याची माहिती पुढे आली आहे. यामध्ये सर्वाधिक कारखाने सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत. राज्यातील साखर कारखान्यांकडे यंदाच्या २०२५–२६ च्या गाळप हंगामातील ३१ जानेवारी अखेरच्या अहवालानुसार, शेतकऱ्यांच्या एफआरपीची उसाच्या तोडणी वाहतूक खर्चासह ४ हजार २५२ कोटी रुपये रक्कम अद्यापही थकीत आहे. या अहवालावरून २ सहकारी आणि २ खासगी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपीचा एकही रुपया अर्थात शंभर टक्के रक्कम थकीत आहे. ४१ कारखान्यांनी उसाच्या एफआरपीची शंभर टक्के रक्कम दिली आहे. तसेच ७५ कारखान्यांनी ८० टक्के ते ९९ टक्के रक्कम, ६० टक्के ते ८० टक्के रक्कम ४४ कारखान्यांनी तर शून्य ते ६० टक्क्यांपर्यंतची रक्कम ४५ कारखान्यांनी दिली आहे. त्यानुसार साखर आयुक्त डॉ. संजय

▶▶ पान २ वर

# राज्यात ग्रामपंचायत निवडणुकीचे बिगुल वाजले

## २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेला सुरुवात

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात संपत आहे, तसेच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरु होणार असून, ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.**

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे.




प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील. जिल्हाधिकाऱ्यांकडून संक्षिप्त तपासणी झाल्यानंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावाला मान्यता देईल, असे ग्रामविकास विभागाने म्हटले आहे. याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागच्या

▶▶ पान २ वर

### ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना

जिल्हाधिकारी सर्व प्रस्तावांची पडताळणी करून २८ एप्रिल २०२६ पर्यंत प्रभाग रचना अंतिम करतील आणि ती राज्य निवडणूक आयोगाला सादर केली जाईल. तर दि.४ मे २०२६ रोजी अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी प्रसिध्द करणार आहेत.

# पार्थ पवारांचा राज्यसभेचा मार्ग मोकळा !

## मुंढवा जमीन घोटाळ्यात खारगे समितीकडून क्लीन चिट

मुंबई । प्रतिनिधी



पुण्यातील मुंढवा परिसरातील १८०० कोटी रुपये किंमत असलेली जमीन ३०० कोटी रुपयांमध्ये पार्थ पवार यांच्या कंपनीकडून खरेदी केली गेली होती. प्रकरण समोर आल्यानंतर हा व्यवहार रद्द करण्यात आला आणि राज्य सरकारने महसूल सचिव विकास खारगे यांची समिती नियुक्त केली होती. या समितीचा अहवाल राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर करण्यात आला असून, त्यात पार्थ पवार यांना अभय दिले गेले आहे. त्यामुळे पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाल्याची चर्चा रंगली आहे.

पुण्यात मोक्याच्या ठिकाणी असलेली जागा पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने स्वस्तात खरेदी केली होती. या जमिनीचे बाजारभावाप्रमाणे मूल्य १८०० कोटी रुपये इतके आहे. पण, ती ३०० कोटी रुपयांत खरेदी केली गेली असल्याचा आरोप झाला. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री अजित पवारांनी हा व्यवहार रद्द केला होता. यापूर्वी पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रामध्ये पार्थ पवार यांना क्लीन चिट देण्यात आली आहे. त्यावरून सरकारवर टीका झाली. मात्र, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले होते की, राज्य सरकारने चौकशीसाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल आलेला नाही, त्यामुळे पूर्णपणे क्लीन चिट मिळालेली नाही. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हा अहवाल सादर केला गेला आहे. हा अहवाल आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला जाणार आहे. या अहवालात असे नमूद केले गेले आहे की, मुद्रांक शुल्क नियमानुसार व्यवहार करणारा जबाबदार असतो. अमेडिया कंपनीने हा व्यवहार केला असला, तरी पार्थ पवार यांची त्यावर स्वाक्षरी नाही. पार्थ पवार हे अमेडिया कंपनीचे भागीदार असले तरी त्यांचा मुंढव्याच्या जमीन खरेदीत थेट संबंध येत नाही. या व्यवहारात सामील असलेल्या दोन अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची, तर पाच अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची शिफारस

▶▶ पान २ वर

# सुनेत्रा पवारांसह राष्ट्रवादी नेत्यांची फडणवीसांच्या भेटीला

## विमान अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी



मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. सुनेत्रा पवार, सुनिल तटकरे, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ आणि पार्थ

▶▶ पान २ वर

# सप्तपदी नाही म्हणजे विवाह बेकायदेशीर असे अजिबात नाही

## दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा



नवी दिल्ली । वृतसंस्था

लग्नात केवळ सप्तपदीचा विधी झाला नाही, म्हणून ते लग्न अवैध ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. कोर्टाने नमूद केलंय की जोडप्याने काही विधी पार पाडल्यानंतर एकत्र राहण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या विवाहातून एक अपत्य जन्माला आले असेल तर ते लग्न अवैध ठरवता येणार नाही.

कौटुंबिक न्यायालयाने २७ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या

▶▶ पान २ वर

### हिंदू विवाह कायदा काय सांगतो ?

उच्च न्यायालयाने हिंदू विवाह कायदा १९५५ च्या कलम ७ अंतर्गत वैधानिक योजनेचे विश्लेषण केले गले. कलम ७ मधील उपकलम १ नुसार, कोणत्याही विशिष्ट समारंभाचे बंधन न घालता कोणत्याही पक्षाच्या रीतिरिवाजानुसार आणि समारंभानुसार विवाह करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. तसंच, उप कलम २ नुसार, वैध विवाह स्थापित करण्यासाठी प्रत्येकवेळी सप्तपदी करणे अपरिहार्य नाही. म्हणजेच सप्तपदी हा पारंपरिक संस्कारांचा एक भाग आहे. पण हा विधी बंधनकारक नाही असे नमूद करण्यात आले.

# ऊसतोड कामगारांना मिळणार 'सुरक्षिततेचा आधार'



पुणे । प्रतिनिधी

राज्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबांच्या, विशेषतः महिला कामगारांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र सरकार एक नवीन पथदर्शी आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प राबवत आहे. साखर कारखाने, सरकारी योजना आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांना प्रभावीपणे जोडून हा उपक्रम राबविला जाणार आहे. साखर आयुक्त डॉ.संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय राज्यस्तरीय गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वरील निर्णय

▶▶ पान २ वर

# देवगिरीवर ठरलं, विलीनीकरण स्टॉप!

## राष्ट्रवादीकडून धनंजय मुंडे यांना ऊर्जा

मुंबई । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे अपघाती निधन, मंत्री नरहरी झीरवळ यांच्यावरील आक्षेप, दोन्ही राष्ट्रवादीचे विलनीकरण आणि पक्ष पातळीवरील निर्णय यासंदर्भात सोमवारी देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या पक्षाचे आमदार, मंत्री यांच्या बैठकीत विलीनीकरणाला स्टॉप देण्याचा निर्णय त्याचसोबत पक्ष वाढीसाठी आमदार धनंजय मुंडे यांना पक्षाकडून ऊर्जा देण्याचा निर्णय बैठकीत झाला.**





सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी उपमुख्यमंत्री सुनिताताई पवार यांच्या शासकीय देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदार, मंत्री, पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये एकूण सर्वच विषयावर चर्चा झाली. सर्व आमदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्राताई पवार यांचे नाव सुचवले आणि सर्वांनी होकार दिला. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्राताई पवार यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून, येत्या काही दिवसांमध्ये याची अधिकृत घोषणा केली जाणार आहे. याच बैठकीमध्ये मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील एका लिपिकाला लाच घेताना पकडल्यानंतर झिरवळ हे वादाच्या भवऱ्यात अडकले होते. मात्र त्यांच्या बाबतीत सॉफ्ट कॉर्नर घेण्यात आल्याचे समजते. कारण लाच घेणारा त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी आहे तेव्हा झिरवळ यांना दोष देऊन उपयोग नाही. यासोबतच पक्षाला दादाची मोठी उणीव भासत असून, आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका आणि आगामी काळातील पक्षाची ध्येय धोरणे यावर चर्चा करण्यात आली. पक्ष वाढीसाठी आता सर्वांनी जोमाने कामाला लागले पाहिजे, पक्षाचे आणि अजितदादांचे विचार तळागाळातील कार्यकर्त्यापर्यंत पोहोचविण्यासाठी तरुण तडफदार नेतृत्व आवश्यक आहे. पक्षाला वेळ देणाऱ्या नेत्याविषयी देखील सर्वांमध्ये चर्चा झाली. अनेकांच्या तोंडून माजी

▶▶ पान २ वर







# केंद्रीय कर्मचाऱ्यांची मज्जा ; पगारात होणार वाढ

नवीदिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारने गेल्या वर्षी आठव्या वेतन आयोग मंजूर केल्यापासून केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनर्सच्या नजरा आता जानेवारी–जून २०२६ च्या महागाई भत्त्याकडे (डीए) लागून आहे. होळीच्या मुहूर्तावर केंद्र सरकार मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात डीएबद्दल घोषणा करणे अपेक्षित आहे. दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे मार्चमध्ये महागाई भत्ता जाहीर होणार आहे. तो जानेवारीपासून लागू होईल म्हणजे केंद्रीय कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याच्या

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# रस्त्यावरची राजकारणशैली आणि लोकशाहीची पडझड

पुण्यात दोन राष्ट्रीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी ही केवळ स्थानिक पातळीवरील घटना म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. ती आपल्या राजकीय संस्कृतीच्या अधोगतीचे जिवंत उदाहरण आहे. ज्या पक्षांनी देशव्यापी नेतृत्वाचा दावा केला, लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची शपथ घेतली आणि सामाजिक परिवर्तनाचे घोषवाक्य दिले, त्याच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर एकमेकांची डोकी फोडणे, गाड्या तोडणे आणि सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे, ही घटना लांच्छनास्पद, अशोभनीय किंवा अनैतिक अशा शब्दांच्या पलीकडची आहे.

एकीकडे स्वतःला 'पार्टी विथ द डिफरन्स' म्हणवून घेणारा सत्ताधारी पक्ष आणि दुसरीकडे शतकाहून अधिक इतिहास असलेला राष्ट्रीय पक्ष या दोघांच्या कार्यकर्त्यांनी जर विवेक सोडून हिंसक मार्ग स्वीकारला, तर लोकशाहीच्या पायावरच आघात होतो. प्रश्न केवळ कार्यकर्त्यांच्या वर्तनाचा नाही; प्रश्न त्यांच्या नेतृत्वाच्या मौनाचाही आहे. या घटनेनंतर संबंधित नेत्यांनी स्पष्ट, ठाम आणि सार्वजनिक भूमिका घेतली का? कार्यकर्त्यांना संयमाचे धडे दिले का? की अशा घटनांकडे 'राजकारणात असे होतच असते' म्हणून दुर्लक्ष करण्यात आले? आजची परिस्थिती अशी आहे की, कार्यकर्त्यांचे वर्तन अनेकदा त्यांच्या नेत्यांच्या शैलीचेच प्रतिबिंब असते. संसदेत, विधानसभेत किंवा सार्वजनिक व्यासपीठांवर जर आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन गोंधळ, घोषणाबाजी आणि कामकाज ठप्प करण्याची स्पर्धा सुरू असेल, तर तळागाळातील कार्यकर्त्यांकडून संयमाची अपेक्षा कशी ठेवायची? ज्या सभागृहात गंभीर चर्चा व्हावी, जिथे जनतेच्या पैशातून चालणारे प्रत्येक मिनिट मौल्यवान असते, त्या ठिकाणीच जर गोंधळाला राजकीय शस्त्र मानले जात असेल, तर रस्त्यावरचे आंदोलनही त्याच पद्धतीने उफाळून येणार, यात नवल काय? लोकशाही ही केवळ मतपेटीत मर्यादित नसते. ती वर्तनसंहितेत, संवादशैलीत आणि मतभिन्नतेचा स्वीकार करण्यात प्रकट होते. परंतु आज मतदारांची गरज पाच वर्षांतून एकदाच भासते, अशी मानसिकता राजकारणात दृढ होत चालली आहे. निवडणुका पार पडल्या की जनतेच्या भावनांचा विचार दुय्यम ठरतो. प्रतिमेची काळजी, मूल्यांची जपणूक आणि सार्वजनिक शिस्तहे शब्द केवळ भाषणापुरते उरतात. या पार्श्वभूमीवर महापुरुषांच्या नावाचा राजकीय वापर हा आणखी एक चिंताजनक प्रवाह आहे. ज्या महापुरुषांनी समाजात समता, बंधुता आणि विवेकाचे बीजारोपण केले, त्यांचे विचार आचरणात आणणे कठीण आहे; पण त्यांच्या नावाने राजकीय भूमिका सजवणे सोपे आहे. त्यामुळेच त्यांच्या विचारांची अंमलबजावणी न करता, त्यांच्या प्रतिमांचा आणि घोषणांचा वापर सत्तेची गणिते जुळवण्यासाठी केला जातो. भेदाभेद नष्ट करण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या समाजसुधारकांची जातीपातीत विभागणी करून राजकीय फायद्याचे समीकरण मांडणे, ही दुर्दैवी वस्तुस्थिती आहे. हिंसक आंदोलन, सार्वजनिक संपत्तीची तोडफोड आणि वैचारिक पातळीचा ऱ्हास या तिन्ही गोष्टी एकमेकांशी निगडित आहेत. वरती जे घडते तेच खाली पाझरते. नेतृत्व जर संवादाऐवजी संघर्षाला प्राधान्य देत असेल, तर कार्यकर्त्यांकडून संयमाची अपेक्षा करणे दांभिक ठरते. म्हणूनच या घटनेची जबाबदारी केवळ काही 'उत्साही' कार्यकर्त्यांवर ढकलून मोकळे होता येणार नाही. आता तरी सर्व पक्षांनी आत्मपरीक्षणाची वेळ ओळखली पाहिजे. राजकीय मतभेद असतीलच; ते असणे लोकशाहीसाठी आवश्यकही आहे. परंतु मतभेदांचे रूपांतर वैचारिक संघर्षात व्हावे, वैयक्तिक किंवा शारीरिक संघर्षात नव्हे. कार्यकर्त्यांना प्रशिक्षण, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव देणे ही पक्षांची प्राथमिक जबाबदारी आहे. अन्यथा 'राष्ट्रीय पक्ष' हा दर्जा केवळ नावापुरता उरेल.

लोकशाहीची प्रतिष्ठा राखायची असेल, तर रस्त्यावरची भाषा बदलावी लागेल. विचारांची लढाई विचारांनीच लढावी लागेल. अन्यथा उद्या इतिहास या घटनांकडे केवळ एक राजकीय चूक म्हणून नव्हे, तर लोकशाही संस्कृतीच्या घसरणीच्या टप्प्याप्रमाणे पाहीलआणि तेव्हा दोष देण्यासाठी कोणीही उरणार नाही.

## मुंबई क्लायमेट वीकमध्ये पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला कृतीप्रधान लढ्याचा संदेश

# हवामान कृतीसाठी युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा-पंकजा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**हवामान कृतीसाठी शासन, शहर संस्था आणि नागरिक यांची भागीदारी आवश४यक असून युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. समुदाय जनजागृती, हवामान साक्षरता आणि युवक उपक्रमांद्वारे शाश्वत महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री मंत्री पंकजा मुंडे आज येथे केले.**

मुंबई क्लायमेट वीकचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज जिओ वर्ल्ड कन्व्हेशन सेंटर येथे झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याच्या पर्यारवण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. केंद्रीय नवनवीनीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण



कार्यक्रम विभागाचे संचालक मार्टिन क्रुसे आदी मान्यवर उपस्थित होते. विविध देशांतील प्रतिनिधी मुंबई क्लायमेट वीकच्या मंचावर एकत्र येत असून, जागतिक सहकार्य आणि व्यवहार्य भागीदारीतूनच हवामान कृती यशस्वी होईल. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण निर्माण करणे हीच आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे श्रीमती मुंडे यांनी यावेळी अधोरेखित केले. हवामान बदलाविरुद्धचा लढा आता केवळ चर्चेपुरता न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात पोहोचल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगभरातील शहरांनी हवामान कृतीची जबाबदारी स्वीकारली असून, भारताकडून या जागतिक चळवळीत मुंबई क्लायमेट वीक हा ठोस आणि कृतीप्रधान वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले. 'संपूर्ण जग एक कुटुंब आहे'' ही आपल्या संस्कृतीची भावना हवामान कृती ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करते. एका प्रदेशावर होणारा परिणाम अखेरीस सर्वांवर होतो. महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईसमोर उभे असलेले हवामान आव्हान गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. वाढते शहरी तापमान, अतिवृष्टी, पूरस्थिती, किनारपट्टीवरील ताण आणि वायू गुणवत्तेवरील दबाव या गंभीर बाबी आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातही अनपेक्षित दुष्काळ व पूर यांचा फटका बसत असून या पार्श्वभूमीवर मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना हा उपक्रम केवळ चर्चेसाठी नसून प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि वित्तपुरवठ्याच्या मार्गांना चालना देण्यासाठी आहे. सर्वांनी या मंचातील चर्चांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून व्यवहार्य उपाय सुचवावेत, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले. महाराष्ट्र औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि विकासाच्या आघाडीवर असताना हवामान प्रतिकार शक्ती, आर्थिक विकास आणि सामाजिक समावेशन यांचा समन्वय असलेल्या हवामान संवेदनशील विकासाची दिशा स्वीकारत असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. ऊर्जा, नागरी विकास, पाणी आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवून कृतीप्रधान धोरण राबवले जात आहे. सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमतेचा विस्तार, शहर नियोजनात हवामान जोखमींचा समावेश आणि विभागनिहाय शाश्वत नियोजन यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. आव्हानांची व्याप्ती मोठी असल्याने अधिक मजबूत भागीदारी आणि नवोन्मेष आवश्यक असून हवामान-संवेदनशील नियोजन आणि प्रतिरोधक पायाभूत सुविधा ही राज्य आणि देशभर मानक पद्धत व्हावी, हा शासनाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या परिषदेत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील शहरांसह ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यापूर्वीच विविध देशांतील प्रतिनिधींशी केलेल्या संवादातून समान पर्यावरणीय चिंता आणि उपाययोजनांवर चर्चा झाल्याचे त्यांनी नमूद केले. हवामान कृती यशस्वी होण्यासाठी सर्वांनी एकाच दिशेने विचार करून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित पर्यावरण निर्माण करण्याचे सामूहिक ध्येय ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. जबाबदारीची जाणीव हीच भविष्य घडवते, असे सांगत पुढील दिवसांत ठोस निष्पत्ती, टिकाऊ भागीदारी आणि मोजता येण्याजोगी हवामान प्रगती साधण्याची अपेक्षा श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

## शहागड ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराविरोधात ग्रामस्थांचे उपोषण

### गटविकास अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे आंदोलन तीव्र

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शहागड ग्रामपंचायतीत शासकीय योजना व विकासकामांमध्ये झालेल्या कथित अनियमितता आणि भ्रष्टाचाराविरोधात संतप्त ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. या प्रकरणात पंचायत समिती प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलकांकडून करण्यात येत आहे.**



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, विविध शासकीय योजनांतील निधीचा अपव्यय, अपूर्ण विकासकामे आणि नियमबाह्य खर्च याबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने ठोस कारवाई केली नाही. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जात असून, त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी या विषयावर प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. दरम्यान, यापूर्वी फुलंब्री पंचायत समिती येथेही अशाच प्रकारच्या निषेधाची घटना घडल्याची चर्चा आहे. त्यामुळे अंबड पंचायत समितीअंतर्गत परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या आंदोलनाची दखल घेत भाजप नेते सतीश घाटगे यांनी मंगळवारी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. ग्रामस्थांच्या मागण्या व आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. विकासकामांमधील अनियमितता प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी सतीश घाटगे यांनी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच ग्रामपंचायतीच्या कारभाराची सखोल तपासणी करून ग्रामस्थांच्या मागण्यांवर कार्यवाही करण्याची मागणी केली. यावर गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. उपोषणस्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, आंदोलक आणि पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर पुढील भूमिका काय असेल, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती शांततेत साजरी करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**



**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक व समाजप्रबोधनात्मक उपक्रम राबवून उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, असे आवाहन परतूर-मंठा विभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी केले. मिरवणुकीदरम्यान अनुचित प्रकार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्यात डीवायएसपी रामेश्वर रेंगे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, नगराध्यक्ष शहाजी राक्षे, विजय राखे आदी उपस्थित होते. रेंगे पुढे म्हणाले की, शिवजयंती निमित्त सामाजिक व समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे. मिरवणुकीत शांतता, एकोपा आणि बंधुभावाचे दर्शन घडावे. कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता उत्सव समित्यांनी घ्यावी. कायदा व सुव्यवस्थेला बाधा येईल असे कृत्य टाळावे. मिरवणुकीत दारू पिऊन धुडगूस घालणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही, असा कडक इशाराही त्यांनी दिला.पोलीस निरीक्षक सुदाम भागवत म्हणाले की, शिवजयंती तसेच मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना शांततेत आणि सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. गैरप्रकार करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार असून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली आहे.परतूर शहरात मिरवणुकीदरम्यान सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## पत्रकारांच्या आंदोलनला मोठे यश; पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत जालन्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद बांधकाम विभागात पत्रकार भरत मानकर यांना अर्वाच्च शिवीगाळ, धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी एका गुत्तेदाराने दिल्याची घटना सोमवार (दि २) रोजी घडली होती. त्यासंदर्भात भरत मानकर यांनी कदीम जालना पोलीसांत तक्रार दाखल केली होती. असे असले तरी कदीम जालना पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यास विलंब होत होता. याप्रकरणी दैनिक राज्य लोकतंत्र या वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करताच पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल केला. अशावेळी पत्रकाराने पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर मंगळवार (दि १७) रोजी एक दिवसीय लक्षवेधी आंदोलनचा ईशारा दिला होता. या आंदोलनाच्या ईशाऱ्यानंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले आणि मंगळवार (दि १७) रोजी आंदोलनाला सुरुवात करण्यापुर्वीच गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन देत कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार भरत मानकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकार यांच्या आवाहनानंतर मंगळवार (दि १७) रोजी सकाळी दहा वाजल्यापासून पत्रकार बांधव पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर जमा होण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर तातडीने जालना तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या मध्यस्थीनंतर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन तक्रारदार भरत मानकर यांना देण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व पत्रकारांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठले. कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार भरत मानकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल केल्यानंतर पत्रकार एकजुटीचा विजय असो अशा घोषणाबाजी करण्यात आली.**

दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे की, दिनांक २ फेबुवारी २०२६ रोजी दुपारी एक वाजता जिल्हा परिदष बांधकाम विभाग येथील कर्मचारी सहाय्यक लेखा अधिकारी श्री हरुण यांच्या कॅबिनमध्ये बातमीच्या अनुषंगाने जिल्हाभर सुरु असलेल्या कामांची माहिती घेत असतांना तेथे बांगड नावाचे गुत्तेदार आले. व त्यांनी भरत मानकर यांना उद्देशुन कोण मादर... पत्रकार आहे. खुप मोठा पत्रकार लागून गेला का अशा घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. व तुझे हात पाय तोडुन टाकु तुला लय मस्ती आली का? विनाकारण आमच्या कामाची माहिती घेऊन बातम्या करु नको असे म्हणून श्री मानकर यास धक्काबुक्की करुन जीवे मारण्याची धमकी दिली. यावर तेथे असलेले जि.प. कर्मचारी श्री हरुण, विक्की हिवाळे, विष्णु कदम यांनी सोडवासोडवी केली. व श्री हरुण यांनी श्री मानकर यांना टेंशन न घेण्याचा सल्ला देत घरी जाण्यास सांगितले त्यावर श्री मानकर तेथून निघून गेले. श्री बांगड हे जालना येथील घायाळ नगर येथील रहीवासी असल्याचे फिर्यादीत नमूद असून श्री मानकर यांच्या या फिर्यादीवरून भारतीय न्यास संहिता २०२३ नुसार ३५२ व महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम २०१७ नुसार ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी हे करणार आहेत.

## पान १ वरून...

### ४५ साखर कारखान्यांना थकीत

कोलते यांनी या ४५ कारखान्यांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यासाठी त्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी दोन दिवसांची सुनावणी ठेवण्यात आली. साखर आयुक्तालयात ही सुनावणी घेण्यात येत आहे. ज्या कारखान्यांनी रक्कम दिली नाही अशांवर एफआरपी कायद्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महसूल वसुलीची कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

----------

### पार्थ पवारांचा राज्यसभेचा

या अहवालात करण्यात आली आहे. अमेडिया कंपनीला मदत करणारे तहसीलदार सूर्यकांत येवले आणि दुय्यम निबंधक तारु यांच्यावर कठोर कारवाईची शिफारस केली गेली आहे. या दोघांना आधीच निलंबित करण्यात आलेले आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या राजकारणात प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांची राज्यसभेतील जागा रिक्त होणार आहे. त्यांच्या जागेवर पार्थ पवार राज्यसभेत जाणार असल्याची चर्चा अजित पवारांच्या निधनापासूनच सुरू झाली होती. मात्र, मुंढवा जमीन घोटाळा प्रकरण पार्थ पवारांच्या वाटेतील अडसर समजले जात होते. आता त्यातून क्लीन चिट मिळाल्याने पार्थ पवारांचा मार्ग मोकळा झाला आहे.

------------

### राज्यात ग्रामपंचायत

सह सचिव वर्षा भरोसे यांनी जारी केले आहेत. दरम्यान, ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेबाबत हरकती मागवण्यासाठी ७ एप्रिल २०२६ रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली जाईल. नागरिकांना आपल्या हरकती १३ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदवता येतील. प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी सुनावणी घेतील.

------------

### ऊसतोड कामगारांना

घेण्यात आला. ऊसतोड हंगामासाठी दरवर्षी जिल्ह्याबाहेर स्थलांतर करणाऱ्या हंगामी कामगारांना शासन व संस्थांची अस्तित्वातील धोरणे आणि कल्याणकारी योजनांचे लाभ प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे यावेळी ठरविण्यात आले. साखर आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या परिषदेत ७ महत्त्वाचे शासकीय विभाग, ७० पेक्षा जास्त साखर कारखाने, २ उद्योग संघटना आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. शाश्वत ऊस उत्पादनासाठी जागतिक व्यासपीठ असलेल्या 'बॉन्सुक्रो' आणि 'विस्मा' अर्थात वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांच्या सहकार्याने, या क्षेत्रातील सामाजिक शाश्वतता मजबूत करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. साखर आयुक्त डॉ. कोलते म्हणाले, महाराष्ट्राच्या साखर अर्थव्यवस्थेत उत्पादनाइतकेच ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांचे, विशेषत: स्थलांतरित महिला कामगारांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. विविध सरकारी विभागांमधील समन्वय सुधारून आणि साखर कारखाने व नागरी संस्थांशी भागीदारी करून, आम्ही प्रत्येक कामगाराला त्यांना आवश्यक सरकारी व संस्थात्मक सेवा मिळवून देऊ शकतो. चर्चेत स्थलांतरित ऊसतोड कामगारांना आरोग्य सेवा, शिक्षण आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यातील अडचणींवर लक्ष केंद्रित करण्यात आले. विशेषत: महिला कामगारांवर शेतातील कष्टाच्या कामासोबतच कुटुंबाच्या संगोपनाची जी अतिरिक्त जबाबदारी असते, त्याकडे लक्ष वेधण्यात आले. पुणे विभागाचे अप्पर कामगार आयुक्त बी. बी. वाघ सार्वजनिक आरोग्य विभागाचे अप्पर संचालक डॉ. संदीप सांगळे यांनीही आपली मते मांडली. या परिषदेत 'बॉन्सुक्रो-विस्मा' यांच्या 'ग्रो' या पथदर्शी कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प सोलापूर, पुणे, कोल्हापूर आणि विजापूर जिल्ह्यांमध्ये राबवला जाणार असून तो कारखान्यांच्या स्तरावरील कृती आणि सरकारी वितरण प्रणाली यांच्यात समन्वय साधेल.

------------

### सप्तपदी नाही म्हणजे विवाह

खंडपीठाने वरील याचिका फेटाळून लावली होती. त्यामुळे या प्रकरणातील पतीने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. याचिकाकर्त्याने विवाहाच्या अनेक विधींमध्ये गैरहजर राहिल्याचा युक्तिवाद करून हे लग्न रद्दबातल करण्याची मागणी केली. मात्र, तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याच्या आधारे कौटुंबिक न्यायालयने हा दावा निराधार ठरवून याचिका फेटाळून लावली होती.याचिकाकर्त्याचे १९ जून २०१६ मध्ये एकमेकांना हार घालून लग्न झाले. परंतु, यावेळी त्यांच्या लग्नसोहळयात सप्तपदी हा विधी झाला नाही. त्यानंतर हे जोडपे एकत्र राहू लागले. त्यांच्या सहजीवनातून त्यांना एक मुलगीही झाली. परंतु, याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की ऑक्टोबर २०१६ पासून तो पत्नीबरोबर राहत नव्हता. त्या दोघांमध्ये सप्तपदीचा विधी झाला नसल्याने त्याने पत्नीबरोबर राहण्यास नकार दिला. तर, प्रतिवादी म्हणजे याचिकाकर्त्याच्या पत्नीने दावा केला की ऑक्टोबर २०१७ मध्ये तिला सासरच्या घरातून हाकलून लावण्यात आले. तसेच, लग्नसोहळ्यात सप्तपदी कार्यक्रम झाला असल्याचा दावाही पत्नीने केला. परंतु, या सोहळ्याचे फोटो न्यायालयासमोर ठेवण्यास ती अपयशी ठरली.

------------

### सुनेत्रा पवारांसह राष्ट्रवादी

पवार यांनी फडणवीस यांची भेट घेत, मागणीचे पत्र सुपूर्द केले. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाशी संपर्क साधण्याचे आश्वासन दिले असल्याची माहीती राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले आहे की, राज्य सरकार या संदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाशी संपर्क साधेल. सरकारने आधीच स्वतंत्र एजन्सींकडून चौकशी सुरू केली आहे आणि सीबीआय चौकशीचे आदेश देण्याचे सांगितले आहे. केंद्रीय एजन्सीकडून चौकशी व्यापक असेल असे आम्हाला वाटते. राष्ट्रवादी पक्ष सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी पूर्णपणे आहे आणि त्यात कोणताही मतभेद नसल्याचे तटकरे म्हणाले. सुनील तटकरे यांनी पुढे माहिती दिली की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेतली आहे. राज्य सरकार केंद्र सरकारकडे या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याबाबत विनंती करणार आहे. मुख्यमंत्री या नात्याने फडणवीस स्वतः या प्रक्रियेत पुढाकार घेऊन तातडीने पत्रव्यवहार करतील, असे आश्वासन त्यांनी दिले आहे. आता हे प्रकरण अधिकृतपणे सीबीआयकडे गेल्यास तपासातून नेमकी कोणती माहिती समोर येते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

-----------

### केंद्रीय कर्मचाऱ्यांची मज्जा ;

पगारात दोन महिन्याची थकबाकी दिली जाईल. जानेवारीचा महागाई भत्ता मार्चमध्ये जाहीर केला जातो आणि जुलैपासून लागू होणारा महागाई भत्ता ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये दिवाळीच्या आसपास जाहीर केला जातो. ७ व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपला असून, आता सर्वांचे लक्ष ८ व्या वेतन आयोगावर असताना यंदाची डीए वाढ महत्त्वाची मानली जात आहे. होळीचा सण जवळ येताना केंद्रीय कर्मचाऱ्यांमध्ये एक नवीन आशा निर्माण झाली आहे. सणासुदीच्या दिवसापूर्वी सरकार पगाराबाबत मोठा निर्णय घेऊ शकते, अशी चर्चा असून मार्चच्या पहिल्या आठवड्यात महागाई भत्त्याबाबत (डीए) महत्त्वाची घोषणा झाल्याचा त्याचा थेट परिणाम लाखो कर्मचाऱ्यांच्या आणि पेन्शनधारकांच्या उत्पन्नावर होईल. सध्या ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत डीए ५८% पर्यंत पोहोचला आहे, तर जानेवारी २०२६ पासून महागाई भत्ता २% वाढू शकतो, ज्यामुळे एकूण डीए ६०% पर्यंत पोहोचू शकतो असा अंदाज आहे. याआधी जानेवारी २००० मध्ये फक्त १% महागाई भत्ता वाढला होता, तर जानेवारी २००७, २०१८ आणि २०२५ मध्ये २% वाढ दिसून आली होती. अशा स्थितीत, १-२% डीए वाढला तरीही त्या कर्मचारी आणि पेन्शनर्सच्या मासिक पगार, थकबाकी आणि पेन्शनवर थेट परिणाम होतो. म्हणजे अगदी छोटी डीए वाढ देखील कर्मचाऱ्यांच्या पगारावर परिणाम करते, कारण महागाई भत्त्यात वाढल्याने केवळ मासिक पगारच वाढत नाही तर त्याचा थेट फायदा पेन्शन आणि थकबाकीदारांनाही मिळतो.

-------------

### देवगिरीवर ठरलं,

मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचे नाव पुढे आले. या नावाला अनेकांनी होकार दिला, त्यामुळे पक्षामधून धनंजय मुंडे यांना ऊर्जा दिली जात आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा पक्षाची धुरा तरुण अशा नेत्याकडे येत आहे. यावर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी देखील धनंजय मुंडे यांनी सक्रिय होणे गरजेचे आहे, आरोप - प्रत्यारोप याकडे फारसे गांभीर्याने न पाहता पक्ष वाढीसाठी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची घोषणा त्याचबरोबर इतर स्टार व्यक्तींची घोषणा देखील केली जाण्याची शक्यता आहे. विशेषतः मंत्रिमंडळामध्ये पक्षांतर्गत काही बदलाचे देखील संकेत या बैठकीतून मिळत आहेत. देवगिरीवर झालेल्या बैठकीला सुनेत्राताई पवार, पार्थ पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवळ, परांजपे, सुनील शेळके, बनसोडे, सुनील पाटील, परिषदेचे उपसभापती, यांच्यासह पक्षाचे प्रमुख मंत्री आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

-------------

cmyk

## थोडक्यात



### भैरवनाथ विद्यालय अरणविहीरा शाळेत इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अरणविरहीरा येथे असलेल्या भैरवनाथ विद्यालय मध्ये दहावी विद्यार्थी विद्यार्थांना निरोपि समारंभ उत्साहात पार या कार्यक्रमासाठी संज्येचे अध्यक्ष मधुकरराव तांदळे साहेब, १००८ ह.भ.प. राजाराम महाराज शास्त्री यांनी सुषग्रामशम त्याचप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवदास शेकडे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. शेकडे के. बी. सर यांनी केले. हभप राजाराम महाराज शास्त्री यांनी विदयाथ्र्याचे उत्तम व सु-सुंस्कार सिक क्षम नागरिक त्याचप्रमाणे अविष्यात योग्य संगत करून चांगल्या ठिकाणी नोकरी व अन्य क्षेत्रात प्राविण्य मिळावे असे शुभअशिवदि दिले. त्याचप्रमाणे मधुकरराव तादळे साहेब यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक भी शिवदास सर योनी विदयार्थक) मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे सर्व शिक्षकाने विदयार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. श्री पी .जे यांनी आभारप्रदर्शन केले. या. कार्यक्रमाचे आंधळे सर व सर व इ.९वी सर्व विदयार्थ्यांनी यशस्वी केले, या शुभ प्रसंगी सर्व विद्यार्थ्यी, सर्व ग्रामस्थ व आमच्या वृपत्राचे प्रतिनिधी प्रेम पवळ उपस्थित होते.

### राज्यस्तरीय पुरस्कार ही माझ्या आयुष्यातली मोठी कमाई-गुलाब शेख



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मौजे कल्याणनगर येथील ग्रामपंचायत शिंपेटाकळी कर्मचारी व टायगर ग्रुप सामाजिक संघटना कार्यकर्ते गुलाब भाई शेख यांच्या कार्याची दखल घेत गुलाब भाई शेख यांना माजी राज्यमंत्री बच्चु भाऊ कडू व राज्यमंत्री रविकांत दादा तुपकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब व वर्ष २०२६ ज्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर असे कलावंत रघुवीर खेडकर साहेब यांच्या हाताने प्रसिद्ध तीर्थस्थळ नाशिक सिन्नर या ठिकाणी सनमानीत करण्यात आले यांना महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ माजलगाव तालुका व बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचारी संघटणा बांधणी मजबुत संघटीत करुन ग्रामपंचायत कर्मचारी कामगारासाठी अहोरात्र काम करत त्यांचे प्रलंबित प्रश्नावर मोर्चे उपोषण करुन संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून न्याय मिळुन दिल्याचे काम केले. ग्रामपंचायत कर्मचारी हा गाव खेड्यातला सर्वात शेवठचा घटक असुन तो सर्वात महत्वाचा आहे हे लक्षात आनुन देन्याचे काम करत आहेत तूट पुंज्या वेतनावर हा कर्मचारी काम करत असतो व सर्व गावातील जनतेला सेवा देतो म्हणूनच मला राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.व मला सामाजिक कार्याची आवड आसल्यामूळे मी सतत गोर गरीब दिन दुबळ्याच्या कामाला सर्व प्रथम प्राधान्य देतो व मी ग्रामपंचायत कर्मचारी आसल्यामुळे माजलगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व माझ्या गावचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी साहेब व गावातील युवा नेते कार्यकर्ते व वरिष्ठ मार्गदर्शक जेष्ठ नागरिक नागरिकांकडून अभिनंदन होत आहे

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६



# आष्टीत १९ फेब्रुवारीला राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन

## शेतकरी नेते शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांचा पुढाकार; हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीची अपेक्षा

आष्टी । प्रतिनिधी

नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन मराठवाड्यातील सर्वात मोठे समजले जाणारे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन (वर्ष - ३ रे) गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे भव्यदिव्य वातावरणात पार पडणार आहे. शेतकरी नेते, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते व सामाजिक नेतृत्व म्हणून ओळख असलेले भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून मतदारसंघातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन युवा नेते अजय धोंडे यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर आयोजित उद्घाटन सोहळ्यास राज्याच्या उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून राज्यातील कृषी क्षेत्रातील धोरणात्मक दिशा, नवतंत्रज्ञान व शेतकरी सक्षमीकरणावर मार्गदर्शन होणार आहे.

शेतकरी हितासाठी आयुष्य समर्पित

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणारे भीमराव धोंडे हे केवळ राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून शेतकरी कल्याणासाठी झटणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात.



आष्टी तालुक्याला कुकडी प्रकल्पाचे पाणी मिळावे यासाठी मुंबईपर्यंत पायी मोर्चा

सुपीक जमीन लष्करी छावणीसाठी अधिग्रहित करण्याचा निर्णय रद्द करण्यासाठी दिल्लीपर्यंत पायी मोर्चा

ग्रामीण भागात शिक्षण संस्था उभारून विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली

या संघर्षांमुळे शेतकरी व ग्रामीण समाजामध्ये त्यांच्याविषयी विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

आधुनिक शेतीचा महामेळा

विज्ञानयुगात शेती व्यवसाय झपाट्याने बदलत असून उत्पादनवाढ, खर्च कमी करणे आणि शाश्वत शेती या उद्दिष्टांसाठी नवतंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कृषी प्रदर्शनात खालील विषयांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन दिले जाणार आहे:

प्रमुख आकर्षणे

अत्याधुनिक कृषी अवजारे व स्मार्ट यंत्रसामग्री, ड्रोनद्वारे फवारणी व पिकांचे निरीक्षण, सुधारित व हवामान-प्रतिरोधक बियाणे, सेंद्रिय व नैसर्गिक शेती तंत्र, ठिबक सिंचन व जलसंधारण उपाय, पशुपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय, फलोत्पादन व उच्च मूल्य पिके, कृषी प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धन तंत्र, विविध शासकीय विभाग, कृषी विद्यापीठे, खाजगी कंपन्या, स्वयंसेवी संस्था व प्रगत शेतकरी यांचे स्टॉल शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र ठरणार आहेत.

कृषी तज्ञ व मान्यवरांचे मार्गदर्शन

कार्यक्रमास कृषी, पशुसंवर्धन, पर्यावरण, प्रशासन व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. धोरणात्मक निर्णय, हवामान बदलाचे परिणाम, बाजारपेठेतील संधी आणि कृषी उद्योजकतेवर विशेष सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून मा. आ. भीमराव धोंडे तर निमंत्रक म्हणून डॉ. अजयदादा धोंडे व अभयराजे धोंडे कार्यरत आहेत.

आयोजन व स्थळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्न आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित कृषी महाविद्यालयाच्या वतीने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. स्थळ: पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर, नगर-जामखेड रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

शेतकऱ्यांसाठी नव्या संधींचे दालन

हे प्रदर्शन केवळ उपकरणे व तंत्रज्ञान पाहण्यापुरते मर्यादित नसून शेतकऱ्यांना:

उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय

बाजारपेठेतील संधी व मूल्यवर्धन

हवामान बदलाशी जुळवून घेणारी शेती

कृषी उद्योजकतेच्या नव्या दिशा

याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना

अशा प्रकारची राज्यस्तरीय प्रदर्शने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देतात. शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक आणि कृषी तज्ञ यांच्यातील संवादामुळे ज्ञानाची देवाणघेवाण होते आणि शेती अधिक शाश्वत व नफ्याची बनविण्याचा मार्ग खुला होतो. शेतकऱ्यांनी या प्रदर्शनात सहभागी होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा आणि शेती व्यवसायात भरभराट साधावी, असे आवाहन युवा नेते अजय धोंडे यांनी केले आहे. एकूणच, आष्टी येथे होणारे हे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन मराठवाड्यातील शेतीला नवी दिशा देणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## ३६०० कि.मी. पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण १९ फेब्रुवारीला अंभोरा येथे भव्य स्वागत सोहळा

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा श्रद्धा, संयम व भक्तिभावाचे प्रतीक असलेली ३६०० किलोमीटरची पायी नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण करून गावात परतणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता अंभोरा येथे भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

परिक्रमेत सहभागी झालेले : श्री. अर्जुन विठोबा आमले। श्री. अंकुश हरिभाऊ ओहाळ । श्री. नामदेव धोंडीभाऊ आमले । श्री. उत्कर्ष अंगद पडोळे। श्री. नामदेव सयाजी खाकाळ । श्री. बबन आश्रुबा खाकाळ या भाविकांनी नर्मदा मातेच्या चरणी नतमस्तक होत ऊन-वारा-पावसाची पर्वा न करता अत्यंत कठीण परिस्थितीत ही दीर्घ पायी यात्रा पूर्ण केली आहे.



नर्मदा परिक्रमा ही केवळ धार्मिक यात्रा नसून आत्मशुद्धी, संयम आणि अध्यात्मिक साधनेचा मार्ग मानली जाते.

स्वागत सोहळ्यानिमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून फुलहार, औक्षण, आरती व जयघोषाच्या माध्यमातून परिक्रमार्थींचा सत्कार करण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या स्वागत समारंभानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत भागवत धर्मप्रचारक ह.भ.प. संजय महाराज घोडके (चिचोंडी पा.) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा भक्तिमय सोहळा समस्त ग्रामस्थ, अंभोरा यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येत असून या कार्यक्रमामुळे गावात आध्यात्मिक ऊर्जा संचारणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## पान ६ वरुन...

### सोनेगाव फाटा ते पाचंग्री

रस्त्यालगत असलेल्या शेतीवरही या धुळीचा विपरित परिणाम झाला आहे. धुळीचे कण पिकांच्या पानांवर साचल्याने पिकांची वाढ खुंटली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. मेहनतीने वाढवलेली पिके डोळ्यादेखत खराब होत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

प्रशासनाकडे तात्काळ कार्यवाहीची मागणी

रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे आणि तोपर्यंत दररोज नियमितपणे रस्त्यावर पाणी मारून धूळ नियंत्रित करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे केली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठेकेदाराला त्वरित कामाचे आदेश द्यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

### शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त

ते बीड जिल्हा परिषद सदस्य म्हणून बहुमताने निवडून आले. त्याच वर्षी ऑगस्ट २०१७ मध्ये त्यांची जिल्हा नियोजन समिती, बीड सदस्य म्हणून निवड झाली. जिल्हा विकास आराखडा व निधी नियोजनात त्यांनी सक्रिय भूमिका पार पाडली. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी महाराष्ट्र मजूर संस्था व व्यंकटेश सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले. तसेच शनी मंदिर, बीड येथे ट्रस्टी म्हणून कार्य करत धार्मिक व सांस्कृतिक कार्यात सहभाग घेतला. उखंडा येथे शिवतीर्थ गड उभारणीसाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. दरम्यान, हा भव्य सन्मान सोहळा दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे तहसीलदार श्री चंद्रकांत जी शेळके असतील. प्रमुख व्याख्याते म्हणून शिवश्री हनुमंत पवार मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख उपस्थितीत श्रीमती प्रिया राणी पाटील, छत्रपती राजश्री शाहू बँक चे अध्यक्ष शिवश्री अजय पाटील व जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे उपस्थित राहणार आहेत.ॲड. प्रकाश दादा कवठेकर यांच्या या सन्मानामुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### नेकनूर, चौसाळा, लिंबागणेश

त्रिंबकरावजी काळे, प्रदीप चौरे, अंकुश गोरे, बप्पासाहेब हावळे (सरचिटणीस), आप्पा झोडगे, अनुसूचित मोर्चा तालुकाध्यक्ष पवन कुचेकर, अल्पसंख्यांक मोर्चा तालुकाध्यक्ष जिया भाई शेख, कोषाध्यक्ष नवनाथ चव्हाण, अशोकराव घोडके, विजय दराडे, अक्षय आमटे, सखाराम खोसे, चौसाळा शहराध्यक्ष विनोदराव काळसे, ज्येष्ठ नेते गावडे सर, राहुल मुळे, भागवत आंधळे, सतीशरावजी कागदे, दीपक वाघीरे, दत्ता वाघेरे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मादळमोही ग्रामपंचायतीचा

त्यांना आर्थिक आधार देण्यासाठी शासकीय नियमानुसार ५ टक्के निधी राखीव ठेवला जातो. मात्र, अनेक ठिकाणी या निधीच्या वाटपासाठी विलंब होतो. मादळमोही येथे शिवसेना तालुकाप्रमुख अजय भैय्या दाभाडे आणि शेख राजू (भाई राजा) यांनी विशेष तत्परता दाखवत हा निधी गरजूंपर्यंत वेळेत पोहोचवण्याचे नियोजन केले. त्यांच्या या पुढाकारामुळे लाभार्थींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, दिव्यांग बांधवांच्या हक्काचा निधी त्यांना सन्मानाने आणि वेळेत मिळवून देणे हे आमचे कर्तव्य आहे. सामाजिक उत्तरदायित्व जपण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.वेळेत निधी मिळाल्याबद्दल ग्रामस्थांनी आणि लाभार्थ्यांनी अजय भैय्या दाभाडे, शेख राजू (भाई राजा) आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

### लहू महाराज बहिर

असल्याने त्यांच्यावर बीड येथील कोकाटे हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. त्यानंतर पुणे येथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मात्र उपचार चालू असतानाच सोमवारी दुपारी त्यांचे पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर त्यांच्या राहत्या गावी शिरापूर गात येथे मंगळवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील स्नेही, गावातील नागरिक, विविध चळवळीतील कार्यकर्ते, विविध पक्षातील कार्यकर्ते, बीड शहरातील डॉक्टर ,वकील, शिक्षक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोशल मीडियावरील

सुरू आहेत. डॉक्टरांनी दोघांचीही प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगितले आहे.

पोलीस प्रशासनाची धाव

घटनेची माहिती मिळताच आष्टीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, विक्रांत हिंगे, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा नरवाडे व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गावात सध्या तणावाचे वातावरण असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला आहे.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे.सोशल मीडियावरील किरकोळ वादातून घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

### एसटी विभागाचा नवा

अमृत ज्येष्ठ नागरिक सर्वसाधारण जेष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळणार आहे दिव्यांगांना यु डी आयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा कार्ड देण्यात येणार आहेत

या योजनेच्या परिपूर्णतेसाठी तीन हजाराहून अधिक अधिकृत एजंट नियुक्त केले असल्याने विभागातील उपविभागात ग्रामीण भागातील प्रवाशांना त्यांना हक्काचे कार्ड मिळणार असून इतर स्वातंत्र्य सैनिक ज्येष्ठ पत्रकारांना विभागामध्ये ओळखपत्र प्राप्त होणार आहे याबाबत परिवहन मंत्र्यांनी योग्य पाऊल उचलले असल्याचे मत आष्टी आगार प्रमुख यांनी व्यक्त केले असून या योजनेचा आणि त्या कार्डचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे

## श्री क्षेत्र हिंगळजवाडी येथे सकल भावसार समाजाचा भव्य सामूहिक धार्मिक सोहळा

वडवणी प्रतिनिधी

श्री हिंगलाज मातेच्या आशीर्वादाने भावसार समाजाच्या एकतेचे, श्रद्धेचे आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारा भव्य श्री हिंगलाज माता महोत्सव दिनांक ७ मार्च २०२६ रोजी तेर जवळील श्री क्षेत्र हिंगळजवाडी ,ता. जिल्हा धाराशिव येथे सकल भावसार समाजाच्या भव्य सांस्कृतिक धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून, पाकिस्तान स्थित बलुचिस्तान येथील हिंगलाज माता उत्सवाच्या धर्तीवर हा सांस्कृतिक धार्मिक सोहळा सकल भावसार समाजाचा संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे.



तरी या धार्मिक सोहळ्यास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन सकल भावसार समाज समिती तेर (धाराशिव) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की दिनांक ७ मार्च २०२६ शनिवार रोजी सकाळी आठ वाजल्यापासून महोत्सवास प्रारंभ होणार असून श्री हिंगलाज मातेची विधिवत पूजा व महाआरती ,विविध धार्मिक विधी, मंगल कार्यक्रम तसेच प्रवचन भजन ,व किर्तन यांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानंतर उपस्थित भावसार समाज बांधवांचे स्वागत तसेच मान्यवर समाजसेवक व लोकप्रतिनिधींचा सत्कार या वेळी करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सकल भावसार समाज धार्मिक सोहळ्यास तन, मन आणि कुटुंबासह उपस्थित रहावे. हेच व्रत असल्याची भावना व्यक्त करत, सर्व समाज बांधव ,माता -भगिनी, युवक- युवती व बालगोपाल यांनी या पवित्र महोत्सवास कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहत श्री हिंगलाज मातेचा आशीर्वाद घ्यावा व समाजाच्या ऐक्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन सकल भावसार समाज हिंगलाज महोत्सव आयोजन समिती तेर (धाराशिव) यांच्या वतीने करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने भावसार समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला नवे बळ मिळणार असून समाजबंध दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## रमजान महिन्यात परळीत पाणीपुरवठा सुरळीत करू- सभापती जयश्रीताई गित्ते

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी नगर परिषद पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी आढावा बैठक घेतली. रमजान महिन्यात शहरात अखंडित व सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

आ. धनंजय मुंडे, ना. पंकजाताई मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांच्या दालनात झालेल्या बैठकीत झाली व मार्गदर्शन केले. रमजान महिन्यात उपवास (रोजा), धार्मिक विधी आणि स्वच्छतेला विशेष महत्त्व असल्याने पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विभाग सतर्क राहणार असल्याचे सांगण्यात आले. परळी वैजनाथ शहरातील विविध प्रभागांतील नगरसेवकांनीही आपल्या सूचना मांडल्या असून त्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या भागात पाणीपुरवठा कमी दाबाने किंवा अनियमित होत असेल, त्या भागातील तक्रारी तत्काळ सोडवण्यात येणार आहेत.तसेच, ज्या भागात पाणीपुरवठा होत नाही अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार एक महिन्यापर्यंत टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याची तयारी नगर परिषद प्रशासनाने दर्शविली आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा संदर्भातील अडचणी असल्यास नगर परिषद पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी युवा नेते रवींद्र (पापा) गित्ते यांच्यासह नगरसेवक अजिज कच्ची, नगरसेवक मंगल इस्माईल, हाजी बाबू, नगरसेवक कादर कुरेशी, नगरसेवक नितीन बागवाले, नगरसेवक अल्ताफ पठाण,नगरसेवक सय्यद हसन, नगरसेवक मोसीन,नगरसेवक बबुभाई, युवा नेते राजीव शेख तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख किरण उपाडे व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## माजलगावात सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा; १४ वर्षांत ५७३ कन्यादानाचा मान

माजलगाव । प्रतिनिधी

समाजातील गोरगरीब व आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांसाठी माजलगाव येथे मागील १४ वर्षांपासून सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. शिवजयंतीचे औचित्य साधत सामाजिक कार्यकर्ते बाळू ताकट यांनी सुरू केलेला हा उपक्रम आज आदर्श सामाजिक चळवळ म्हणून ओळखला जात आहे. आतापर्यंत ५७३ गरजू मुलींचे विवाह लावून त्यांचा संसार उभा करण्याचा मान त्यांनी मिळवला आहे.


छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन बाळू ताकट यांनी शिवजयंतीनिमित्त हा उपक्रम सुरू केला. मुलीच्या लग्नासाठी कर्जबाजारी होणाऱ्या कुटुंबांना दिलासा देण्याच्या उद्देशाने सुरू झालेली ही परंपरा वर्षागणिक अधिक व्यापक होत आहे.

यावर्षीच्या सोहळ्यात २२ जोडपी विवाहबंधनात अडकणार असून या सोहळ्यात मुस्लिम, धनगर, माळी, मातंग, लोहार व मराठा समाजातील वधू-वरांचा समावेश आहे. सर्वधर्मीय व सर्वसमावेशकतेचा संदेश देणारा हा उपक्रम समाजात ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक समता दृढ करत असल्याचे चित्र आहे.



### शिवजयंतीनिमित्त बाळू ताकट यांचा उपक्रम; यंदा २२ जोडपी विवाहबंधनात

विवाह सोहळ्यात नवदांपत्यांना मणी-मंगळसूत्र, जोडवे, कपडे, मेकअप साहित्य, ताट-बाटीपासून सोफासेटपर्यंत विविध संसारोपयोगी वस्तू भेट देण्यात येतात. लोकवर्गणीतून या वस्तूंची व्यवस्था केली जाते. याशिवाय टपाल खात्यामार्फत प्रत्येकी १० लाख रुपयांचा आरोग्य विमा काढून देण्यात येतो.



सोहळ्यासाठी येणाऱ्या सुमारे २० हजार वऱ्हाडी मंडळींच्या भोजनाचीही भव्य व्यवस्था केली जाते. सर्व व्यवस्थापन स्थानिक स्वयंसेवकांच्या सहकार्याने पार पडते. सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने कार्यरत असलेल्या बाळू ताकट यांच्या या उपक्रमामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. शिवजयंती साजरी करण्याचा हा सामाजिक व विधायक आदर्श ठरत असून मूर्ती लहान पण कीर्ती महान याचा प्रत्यय त्यांच्या कार्यातून येत आहे.

## प्रा.सुदर्शन स्वामी यांना पीएच.डी पदवी प्रदान

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्रा.सुदर्शन उद्धवराव स्वामी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत इतिहास विषयामध्ये पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.



प्रा.सुदर्शन उद्धवराव स्वामी यांनी प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे धर्मांतर : एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९४७ - २००७) या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.प्रा.सुदर्शन स्वामी यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके,सरचिटणीस आ.सतीश चव्हाण,यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार,डॉ.बी. एल.चव्हाण, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्र.प्राचार्य डॉ.एन.के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवन शिंदे डॉ.बालाजी बोडके, डॉ.अरुण पेंटावार, डॉ.शंकर इप्पर,डॉ. सचिन रुद्रवार, डॉ.डी.एस.शिंदे, डॉ.बिलास काळे, डॉ.सतीश डाके,प्रा.एस.एस. कदम यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

cmyk

# भाजप सरकारमुळे शेतकऱ्यांवर कर्ज वाढले

## काँग्रेसच्या खासदार शैलजा कुमारी यांचा आरोप

हिस्सार / वृत्तसंस्था

हरियाणामध्ये शेतकरी कर्जाच्या प्रश्नावरून राजकारण तापले आहे. भाजपच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे शेतकरी कर्जात बुडाला आहे, असा आरोप काँग्रेस खासदार शैलजा कुमारी यांनी केला आहे. शैलजा कुमारी यांनी सरकारवर टीका करत सांगितले की, सरकारच्या काळात शेतीचा खर्च सातत्याने वाढला आहे. शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (हमीभाव) पूर्णपणे मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी वेळेवर भरपाई दिली जात नाही. तर भूमिहीन शेतकरी अधिकच अडचणीत आले आहेत. या परिस्थितीत शेती हा नफ्याचा व्यवसाय न राहता अडचणींचा विषय झाला आहे. असा आरोपही त्यांनी केला.



थकीत कर्जाच्या अधिकृत आकडेवारीचा दाखला देत शैलजा कुमारी यांनी सरकारवर निशाणा साधला. राज्यातील प्रत्येक शेतकरी कुटुंबावर सरासरी १ लाख ८३ हजार रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत राज्यातील २५ लाख ६७ हजार ४६७ शेतकऱ्यांवर एकूण ६० हजार ८१६ कोटी रुपयांचे शेतीकर्ज थकीत असल्याचे त्या म्हणाल्या. काँग्रेस नेत्यांनी हरियाणा राज्य सरकारकडे ठोस कर्जमाफी योजना जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच सर्व पिकांसाठी हमीभाव निश्चित करण्यासह नैसर्गिक आपत्तीमध्ये तातडीने नुकसानभरपाई देण्याची आणि लहान व भूमिहीन शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली असून काँग्रेस त्यासाठी आवाज उठवत आहे, असा दावाही शैलजा यांनी केला आहे. दरम्यान, संयुक्त किसान मोर्चाने देशभरातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची मागणी केली आहे. तर महाराष्ट्रातही कर्जमाफीची मागणी जोर धरत आहे. देशातील शेतकऱ्यांवरील कर्जाबाबत सरकारने लोकसभेत सादर केलेल्या माहितीनुसार, एका शेतकरी कुटुंबावर सरासरी ७४ हजार १२१ रुपये कर्ज थकीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात सरासरी प्रति शेतकरी थकीत कर्ज ८२ हजार ८५ रुपये तर मध्य प्रदेशात ७४ हजार ४२० रुपये आहे.शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा आणखी वाढत चालला असताना, केंद्र सरकारकडून कर्जमाफीबाबत कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत.

# बारबरी जातीची शेळी; शेळीपालन व्यवसायासाठी उत्तम पर्याय!

शेतीला जोडधंदा म्हणून कमीत कमी खर्चात, कमीत कमी जागेत मोठा नफा कमावण्यासाठी सध्या अनेक शेतकरी शेळीपालनाकडे आपला कल वळवत आहेत. अशातच सध्या एक उत्तम पर्याय म्हणून शेळीपालन व्यवसायाकडे पाहिले जात आहे. अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण आता मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक दृष्टिकोनातून शेळीपालन व्यवसाय करत असून, त्यामध्ये यशस्वी देखील होत आहेत.

जातिवंत शेळीची निवड महत्वाची : शेळीपालन व्यवसाय यशस्वी होण्याच्या दृष्टिकोनातून शेळ्यांचे आरोग्य व्यवस्थापन, चारा व्यवस्थापन जितके गरजेचे आहे. तितकेच तुम्ही शेळीपालनासाठी कोणत्या जातींच्या शेळ्यांची निवड करतात. त्यावर तुमचे शेळीपालन व्यवसायातील यश अवलंबून असते. राज्यासह देशात अनेक जातींच्या शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु, त्यामध्ये काही जातींच्या शेळया या शेळीपालनाच्या दृष्टिकोनातून अतिशय फायद्याच्या ठरतात.



बारबरी शेळीचे मूळस्थान : शेती क्षेत्रात उत्तर प्रदेश या राज्याची एक खास ओळख असून, बारबरी जातीची शेळी उत्तरप्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळून येते. परंतु शेळीची ही जात मूळची उत्तर प्रदेशमधील नसून, ती आफ्रिकी देशांमध्ये असलेल्या सोमालया येथील बेरिया परिसरामध्ये जास्त प्रमाणात आढळते. यावरून या जातीच्या शेळीचे नाव बारबरी असे पडले आहे.मांस उत्पादनासाठी प्रसिद्ध : शेळीच्या बारबरी जातीचे वैशिष्ट्ये म्हणजे दूध देण्याची क्षमता तसेच मांस उत्पादनक्षमता व एका वेळेस दोन पिल्लांना जन्म देण्याची क्षमता या गोष्टींमुळे या जातीच्या शेळीचे मोठ्या प्रमाणात पालन केले जाते. बारबरी जातीच्या शेळ्यांची मागणी अरब देशांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर आहे. जर या जातीच्या बोकडचे वजन पाहिले तर ते २५ ते ४० किलोपर्यंत असते. या जातीच्या बोकडाचे किंवा शेळ्यांचे मांस हे खूप चविष्ट असल्यामुळे याला मागणी अधिक असते.ही आहेत वैशिष्ट्ये : बारबरी जातीच्या शेळ्या व बोकड यांचे कान वरच्या बाजूला असतात व ते छोटे आणि उभ्या स्थितीत असतात. प्रामुख्याने या जातीच्या शेळ्यांचा रंग हा सफेद असतो व त्यावर भुऱ्या रंगाचे ठिपके असतात. नाक चपटे असते व या जातीच्या शेळ्यांचा शरीराचा मागचा भाग हा वजनदार असतो. या जातीची शेळी १३ ते १४ महिन्याच्या वयामध्ये प्रजननासाठी सक्षम होते. ही शेळी पंधरा महिन्याच्या कालावधीत, दोन वेळा पिल्लांना जन्म देते. याशिवाय ही शेळी प्रजननाच्या दुसऱ्या वेळेपासून ते ९० टक्क्यांपर्यंत दोन ते तीन पिल्लांना जन्म देते. या जातीची शेळी १७५ ते २०० दिवसांपर्यंत दूध देऊ शकते. व ती दररोज एक लिटरपर्यंत दूध देते.

# रसदार लिंबू फळांसाठी योग्य खतांचा करा वापर

नवीन झाडांना फारच कमी खताची गरज असते, पण जसजशी ते वाढतात तसतशी झाडांना खताची गरज भासते. त्याचप्रमाणे, लिंबाची झाडे आहेत ज्यांना संपूर्ण सूर्यप्रकाशासह कोरड्या जमिनीत वाढण्यास आवडते. आता अशा परिस्थितीत, मोठ्या, रसाळ आणि अधिक उत्पादन लिंबूच्या झाडातून हवे असेल तर कशा प्रकारे खते वापरायची याची माहिती असणे गरजेचे आहे.

लिंबाच्या झाडासाठी शेणखत : चांगले तयार केलेले शेणखत पिकाच्या वाढीसाठी चांगले असते. फक्त हे लक्षात ठेवा की लिंबाच्या झाडामध्ये खत चांगले वापरा आणि ते शरद ऋतूमध्येच वापरा. लिंबाच्या झाडाच्या सभोवतालच्या मातीमध्ये खाते घाला. सुमारे २ इंच कंपोस्ट पसरवा, परंतु नुकसान टाळण्यासाठी साल देठापासून किमान दोन इंच दूर ठेवा. प्रति झाड प्रति वर्ष १ गॅलन कंपोस्ट वापरा.

लिंबाच्या झाडासाठी : लिंबाच्या झाडांसाठी खत शोधताना, नायट्रोजनचे प्रमाण ८-८-८ पेक्षा जास्त नसावे. म्हणजे नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम. वाढत्या हंगामात लिंबाच्या झाडांना लावणे चांगले. नायट्रोजन ऍप्लिकेशन्सचे तीन फीडिंगमध्ये विभाजन करा फेब्रुवारी, मे आणि सप्टेंबर लिंबाच्या झाडाला हिवाळ्यात जास्त खत देऊ नये अन्यथा झाड मरून जाऊ शकते.

साइट्रस गेन फर्टिलाइजर : या खतातील पोषक गुणोत्तर ८-३-९ आहे. हे लिंबूवर्गीय वनस्पतींच्या गरजांसाठी तयार केले जाते आणि मुळांचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. या खतामुळे झाडाला अधिक लिंबू तयार होण्यास मदत होऊ शकते. या



खतामध्ये मँगनीज, लोह, तांबे आणि जस्त देखील असतात जे लिंबाच्या झाडासाठी आवश्यक पोषक असतात.

एस्पोमा साइट्रस प्लांट फूड : या खताचे पोषक गुणोत्तर ५-२-६ आहे. ते लिंबाच्या झाडावर वर्षातून फक्त तीन वेळा लावावे लागते. हे खत नैसर्गिक आणि सेंद्रिय आहे.


लिंबाच्या झाडांना खत कसे द्यावे : वसंत ऋतूच्या सुरुवातीस, उन्हाळ्यात दर ४ ते ६ आठवड्यांनी एकदा आपल्या लिंबाच्या झाडाला खत द्या. लिंबाच्या झाडाच्या वाढीदरम्यान ४ ते ६ आठवड्यांच्या अंतराने खते दिल्यास तुमच्या लिंबाच्या झाडाला वाढण्यास आणि फळ देण्यास पुरेसे पोषक असतात याची खात्री होईल. जेव्हा तुमचे लिंबाचे झाड उन्हाळ्याच्या उत्तरार्धात उत्पादन कमी करते, तेव्हा पुढील वसंत ऋतु पर्यंत खत देणे थांबवा. आपल्या लिंबाच्या झाडाला दरवर्षी योग्य हंगामात खत घालण्याची खात्री करा.

# पपईवरील पिठ्या ढेकूण नियंत्रण आणि परोपजीवी ॲसेरोफॅगस

भारतात पपई या पिकावर पिठ्या ढेकूण या किडीचा प्रादुर्भाव ही मोठी समस्या आहे. या किडीचे शास्त्रीय नाव पॅराकॉकस मार्जिनेटस असून, तिचे मूळ मेक्सिक लॅटिनअमेरिका हे आहे. २००८ मध्ये तामिळनाडूतील कोइमतूर जिल्ह्यात तिचा प्रथम प्रादुर्भाव दिसून आला. अल्पावधीतच म्हणजे २०१० पर्यंत या किडीचा महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत झपाट्याने प्रसार झाला.

पिठ्या ढेकूण ही कीड पाने, फुले व फळांतील रस शोषते. परिणामी, पिकाची वाढ खुंटून उत्पादनात घट होते. भारतामध्ये या किडीच्या नैसर्गिक शत्रूंचा अभाव आणि किडीच्या शारीरिक वैशिष्ट्यांमुळे रासायनिक उपाययोजनांची मर्यादित परिणामकारकता यामुळे ही कीड नियंत्रणास आव्हानात्मक ठरत आहे. या किडीचे मूळ स्थान असलेल्या मेक्सिकोमध्ये त्यावर परोपजीवीकरण करणारा मित्रकीटक ॲसेरोफॅगस पपायी आढळून येतो. त्याच्या आवश्यक शास्त्रीय चाचण्या, संगरोध प्रक्रिया व शासकीय मान्यता या पूर्तता केल्यानंतर २०१० मध्ये 'क्लासिकल बायोलॉजिकल कंट्रोल' कार्यक्रमांतर्गत त्याच्या सहकार्याने परोपजीवीचे प्रथम प्रसारण करण्यात आले. पुढे देशातील कृषी विद्यापीठे, संशोधन केंद्रे व कृषी विज्ञान केंद्रांच्या सहकार्याने यशस्वी प्रसार करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्रासह विविध राज्यांत या परोपजीवी मित्रकीटक बऱ्यापैकी स्थिरावला असून, पपईवरील पिठ्या ढेकणाच्या नियंत्रणात लक्षणीय मदत करत आहे.

महाराष्ट्रातील काही भागांत पपईवर पिठ्या ढेकणाचा प्रादुर्भाव दिसून आला असला, तरी प्रक्षेत्र भेटीदरम्यान त्यातील अनेक शेतांमध्ये ॲसरोफॅगस पपाया हा परोपजीवी मित्रकीटक आपले परोपजीवीकरणाचे काम करताना आढळून आला.



म्हणजेच हे मित्रकीटक पपईवरील पिठ्या ढेकणावर प्रभावी जैविक नियंत्रण करत असल्याचे आढळून आले.

मित्र कीटकाची ओळख : प्रौढ (मादी) - प्रौढ मादी कीटकाची लांबी साधारणतः ०.८५ मि.मी. इतकी असते. तिचे डोके व शृंगिका फिकट नारिंगी असून, संयुक्त डोळे हिरवट तर ओसेली लाल रंगाचे असतात. वक्ष फिकट नारिंगी असून, त्याच्या पुढील भागातील प्रोनोटमचा मानेसारखा भाग तपकिरी दिसतो. याची मागील कडा पारदर्शक असून, बाजू किंचित फिकट, जवळ जवळ पिवळसर असतात. पुढील पंख बहुतेक पारदर्शक असून, स्टिग्मल शिरेपासून पंखाच्या मागील कडेपर्यंत एक लहानसा, फिकट गडद गोलसर डाग आढळतो. अंडोत्सर्जन नलिकेचे आवरण फिकट नारिंगी असून टोकाकडे तपकिरी रंगाचे असते.

प्रौढ (नर) -: प्रौढ नर कीटक मादीपेक्षा लहान असून, त्याची लांबी साधारण ०.५ ते ०.६ मि.मी. असते. एकूण रचना मादीसारखीच असली तरी शृंगिकेचा शेवटचा भाग एकसंध व खंडरहित असणे, ही त्याची प्रमुख ओळख आहे. नराच्या पोटाच्या टोकाकडील खंडांवर मादीपेक्षा अधिक गडद रंग दिसतो.

परोपजीवी मित्रकीटक म्हणजे काय? परोपजीवी मित्रकीटक हे हानिकारक किडीच्या जीवनचक्रातील ठरावीक अवस्थेत किडीच्या शरीरात किंवा शरीरावर अंडी घालतात. त्यातून बाहेर पडलेल्या अळ्या किडीवर उपजीविका करतात. त्यातून त्या किडीचा अखेर मृत्यू घडतो.

महत्त्वाच्या बाबी : ॲसेरोफॅगस पपायी हा परोपजीवी मित्रकीटक पिठ्या ढेकणाच्या केवळ पॅराकॉकस मार्जिनेटस या प्रजातीवरच परोपजीवीकरण करतो. तो इतर उपयुक्त मित्रकीटकांसाठी पूर्णपणे सुरक्षित आहे. एकदा शेतात त्यांचे प्रसारण करून सुरुवातीचे काही काळ संरक्षण केले की तो नैसर्गिकरीत्या स्थिरावतो. त्यानंतर फक्त पपईवरीलच नव्हे, तर अन्य पिकांवरील पॅराकॉकस मार्जिनेटस या प्रजातीच्या पिठ्या ढेकणाचेही दीर्घकाळ प्रभावी नियंत्रण करतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी या मित्रकीटकाची ओळख करून घ्यावी. त्यांची उपस्थिती आपल्या शेतात असल्यास रासायनिक कीटकनाशकांची फवारणी टाळावी.

यजमान पिठ्या ढेकणाचा शोध : पिठ्या ढेकणाने स्रवलेल्या गोड चिकट द्रव (हनीड्यू) आणि यजमानाशी संबंधित गंधद्रव्यांमुळे परोपजीवी मादी कीटक त्यांच्याकडे आकर्षित होते.

योग्य यजमानाची निवड : पिठ्या ढेकणापाशी पोहोचल्यानंतर सक्रिय हालचाल करून शृंगिकांच्या साह्याने यजमानाचा आकार, वाढीची अवस्था व परोपजीवीकरणासाठीची उपयुक्तता बारकाईने तपासते. योग्य यजमान म्हणून मादी प्रामुख्याने दुसरी ते तिसरी इनस्टारमधील लहान व मध्यम आकाराच्या पिठ्या ढेकणांची निवड करते. अत्यंत प्रौढ अथवा आकाराने मोठ्या पिठ्या ढेकणांमध्ये अंडी घालणे ती बहुधा टाळते, कारण अशा अवस्थेत परजीवी अळीच्या विकासात अडथळे येण्याची शक्यता अधिक असते.

प्रौढ परोपजीवी बाहेर पडणे : कोषावस्था पूर्ण झाल्यानंतर प्रौढ मित्रकीटक पिठ्या ढेकणाच्या शरीरावर लहान गोल छिद्र पाडून बाहेर येतो. अंड्यापासून प्रौढा अवस्थेपर्यंतचा संपूर्ण जीवनक्रम साधारण १५ ते १८ दिवसांत पूर्ण होतो. प्रौढ कीटक साधारणतः १४ ते १६ दिवस जगतो. बाहेर पडताच प्रौढ कीटक मिलन करून अंडी घालण्यासाठी नवीन पिठ्या ढेकणांचा शोध घेण्यास सुरुवात करतो. अशा प्रकारे परोपजीवीकरणाची प्रक्रिया पुन्हा चालू राहते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९६५ : 'गांबिया'ला इंग्लंडकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७९ : सहारा वाळवंटाच्या दक्षिण अल्जीरियातील भागात बर्फ पडले. सहारा वाळवंटात बर्फ पडण्याची ही एकमेव नोंद आहे.
१९९८ : ज्येष्ठ गांधीवादी नेते, माजी केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सी. सुब्रमण्यन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
२००१ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांना मध्यप्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' प्रदान
२००६ : आजच्या दिवशी भारत पाकिस्तान मध्ये थार एक्सप्रेस ची सुरुवात.
२००६ : आजच्या दिवशी महाराष्ट्राच्या एका पोल्ट्री फार्म येथे देशातील पहिले बर्ड फ्लू ची केस नोंदविल्या गेली.
२०१४ : आजच्या दिवशी संसद मध्ये आंध्रप्रदेश पासून तेलंगाना हे भारताचे २९ वे नवीन राज्य बनण्याचा प्रस्ताव मंजूर झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८६ : योगी चैतन्य महाप्रभू (मृत्यू: १५ जून १५३४)
१७४५ : अलासांड्रो व्होल्टा इटालियन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ५ मार्च १८२७)
१८२३ : रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ 'लोकहितवादी' पत्रकार, समाजसुधारक व इतिहासकार. १८४८ ते १८५० या काळात 'प्रभाकर' या साप्ताहिकातून त्यांनी शतपत्रांचे लेखन केले. स्त्रियांचा कोंडमारा करणार्या रुढींवर त्यांनी प्रहार केला. त्यांनी ४३ मराठी ग्रंथ लिहिले. 'लक्ष्मीज्ञान' हा त्यांचा ग्रंथ हा अर्थशास्त्रावरील पहिला मराठी ग्रंथ आहे. (मृत्यू: ९ आक्टोबर १८९२)
१८३६ : रामकृष्ण खुदिराम परमहंस तथा गदाधर चट्टोपाध्याय स्वामी विवेकानंदांचे गुरू (मृत्यू: १६ ऑगस्ट १८८६ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८७१ : बॅ. विठ्ठलभाई पटेल थोर देशभक्त, राजकीय नेते आणि हिंदुस्थानच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष, सरदार वल्लभभाई पटेल यांचे थोरले बंधू (मृत्यू: २२ आक्टोबर १९३३)
१८८३ : क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा (मृत्यू: १७ ऑगस्ट १९०९)
१८९८ : एन्झो फेरारी रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर (मृत्यू: १४ ऑगस्ट १९८८)
१८९९ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक जयनारायण व्यास यांचा जन्म.
१९११ : कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर ऐतिहासिक कादंबरीकार (मृत्यू: २९ जून २०००)
१९१४ : ऊर्दू शायर व गीतकार जान निसार अख्तर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑगस्ट १९७६)
१९२६ : नलिनी जयवंत अभिनेत्री (मृत्यू: २० डिसेंबर २०१०)
१९२७ : मोहम्मद झहूर खय्याम हाश्मी ऊर्फ 'खय्याम' संगीतकार
१९३३ : नवाब बानू ऊर्फ 'निम्मी' अभिनेत्री
१९६२ : भारतीय चित्रपट अभिनेते विपिन शर्मा यांचा जन्म.
१९६६ : प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक साजिद नाडीवाला यांचा जन्म.
१९८६ : प्रसिद्ध हिंदी धारावाहिक कलाकार जिया मानेक यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९४ : कुबलाई खान मंगोल सम्राट (जन्म: २३ सप्टेंबर १२१५)
१४०५ : तैमूरलंग मंगोल सरदार (जन्म: ९ एप्रिल १३३६)
१५४६ : आजच्या दिवशी जर्मन धर्मसुधारक मार्टिन लुथर यांचे निधन.
१५६४ : मायकेल अँजेलो इटालियन शिल्पकार आणि चित्रकार (जन्म: ६ मार्च १४७५)
१९६७ : जे. रॉबर्ट ओपेनहायमर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अणूबॉम्बचे जनक (जन्म: २२ एप्रिल १९०४)
१९९२ : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (जन्म: २१ ऑगस्ट १९१०)
१९९४ : पंडित गोपीकृष्ण कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. भरतनाट्यम, कथकली, मणिपुरी आदी नृत्यप्रकारांतही त्यांनी नैपुण्य मिळवले होते. १९५७ मध्ये त्यांनी ८२ दिवसांत ८७ कार्यक्रम करुन विक्रम केला. (जन्म: २२ ऑगस्ट १९३५)
२०१६ : आजच्या दिवशी प्रसिद्ध गायक अब्दुल राशिद ख़ान यांचे निधन.
२०१७ : इंडोनेशिया च्या एका प्रांताचे माजी गवर्नर माइकल ओजियो यांचे निधन.

# बटाट्याची ही जात देते बंपर उत्पादन

बटाटा ही बारमाही भाज्यांपैकी एक आहे. त्याची मागणी बाजारात नेहमीच असते. यामुळे बटाट्याची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नेहमीच नफा मिळतो. बटाट्याच्या अशा विविध जातींबद्दल माहिती घेऊन त्याची लागवड केल्यास शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात.

बटाटा हे प्रमुख नगदी पीक आहे. यामध्ये स्टार्च, प्रोटीन, व्हिटॅमिन-सी आणि खनिज क्षार मुबलक प्रमाणात आढळतात. जास्त उत्पादन देणाऱ्या वाणांची वेळेवर पेरणी, खतांचा संतुलित प्रमाणात वापर, योग्य कीटकनाशके आणि बटाट्याचे अधिक उत्पादन घेऊन योग्य पाणी व्यवस्थापन करून शेतकरी उत्पादन आणि उत्पन्न दोन्ही वाढवू शकतात.

बटाटा लागवडीत या जातीला प्राधान्य द्या : आयसीएआरच्या मते, जर तुम्हाला व्यवसायाच्या दृष्टिकोनातून बटाट्याची शेती करायची असेल, तर तुम्ही 'कुफरी पुखराज' जातीला प्राधान्य द्यावे. ही जात उत्तर भारतात खूप लोकप्रिय आहे. हीच जात कमी काळात उच्च उत्पन्नासाठीही ओळखली जाते. या बटाटा पिकावर रोगांचे प्रमाण कमी आहे. यावर दवामुळे हे पीक खराब होण्याची शक्यता देखील कमी आहे. हे पीक सुमारे १०० दिवसांत तयार होते. एका हेक्टरमध्ये ४०० क्विंटलपर्यंतचे पीक त्यातून तयार होते. उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, झारखंड, आसाम, पंजाब, हरियाणा, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा या राज्यांतील एकूण बटाटा उत्पादनात कुफरी पुष्कराजचा वाटा ८० टक्के आहे. देशभरातील बटाट्याच्या एकूण उत्पादनात त्याचा वाटा ३३ टक्के आहे. २०२१-२२ या वर्षात वार्षिक आर्थिक अधिशेष ४७२९ कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६





# महापौरांची जुन्या मनपात सरप्राईज व्हिजिट

## नाराजी केली व्यक्त, जन्ममृत्यू दाखल्याबाबत दिले असे निर्देश

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या कामकाजात गती आणण्यासाठी आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी महापौर ज्योतिताई गाडे यांनी जुन्या महापालिकेतील विविध विभागांना अचानक भेटी दिल्या. या पाहणीदरम्यान त्यांनी स्वच्छतेच्या निकृष्ट स्थितीबाबत नाराजी व्यक्त करत तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.महापौर ज्योतिताई गाडे यांनी आपले वडील कै. शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्यशैलीप्रमाणेच तळागाळात जाऊन अधिकाऱ्यांकडून प्रश्न विचारत सखोल माहिती घेतली. त्यांच्या थेट संवादशैलीमुळे अधिकाऱ्यांनाही आपल्या कामाची पुन्हा तपासणी करावी लागली.



पाहणीदरम्यान महापौरांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, आपण नागरिकांना स्वच्छतेचे धडे देतो, पण आपल्या स्वतःच्या कार्यालयातच अस्वच्छता असणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. दोन दिवसांत जुन्या महापालिकेतील सर्व विभागांची स्वच्छता करण्यात यावी. त्यांनी पुढे सांगितले की, महापालिकेच्या प्रतिष्ठेला आणि नागरिकांच्या अपेक्षांना साजेसे कामकाज झाले पाहिजे. नागरिकांचा विश्वास टिकवणे ही आपली जबाबदारी आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी जन्ममृत्यू विभागाची पाहणी करत नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. त्या म्हणाल्या महापालिकेत दाखल्यांसाठी नागरिकांना ताटकळत रांगेत उभे राहावे लागते. हा त्रास संपवण्यासाठी तत्काळ उपाययोजना करा. सर्व रेकॉर्ड संगणकीकृत करा, जेणेकरून दाखले तातडीने देता येतील. महापौरांनी सावेडी उपनगरात स्वतंत्र दाखला कार्यालय सुरू करण्याच्या सूचना दिल्या आणि नागरिकांसाठी ई-सेवा प्रणाली सुरू करण्याची कल्पना मांडली. त्यांनी आरोग्य विभाग प्रमुख डॉ. सतीश राजूरकर यांच्याकडून शहरातील लसीकरण आणि आरोग्यसेवा याबाबत सविस्तर माहिती घेतली. डॉ. राजूरकर यांनी सांगितले की, शहरात १०३ आशा सेविका कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून लहान मुलांच्या लसीकरणाची माहिती संकलित केली जाते. सध्या शहरात २५० लसीकरण केंद्रे कार्यरत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध आरोग्य योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. 'टीबी मुक्त भारत' अभियानांतर्गत नागरिकांची तपासणी नियमित सुरू आहे. महापौर गाडे यांनी विवाह नोंदणी विभागाचीही पाहणी केली आणि नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवण्याचे आदेश दिले.

महापौरांनी जुन्या महापालिकेतील जळालेल्या सभागृहाचीही पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. शहराच्या प्रतिष्ठेचे प्रतीक असलेले हे सभागृह पुनर्बांधणीसाठी आवश्यक नियोजन करा. या ठिकाणी आधुनिक सुविधा असलेले बहुउद्देशीय सभागृह उभारण्याचा विचार केला जाईल, असे त्या म्हणाल्या. या पाहणीवेळी नगरसेवक ऋग्वेद गंधे, संतोष गांधी, महावीर कांकरिया, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# लहुजी साळवे यांना अभिवादन



रोहिलागड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील चिकनगांव येथे आद्य क्रांतीगुरू लहुजी साळवे यांच्या २३२ व्या स्मृतिदिननिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

दलित, शोषित आणि वंचित समाजासाठी आयुष्यभर लढणारे क्रांतीगुरू केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाचे दीपस्तंभ होते.

त्यांनी लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, परांजपे, गावंडे या सारख्या अनंत क्रांतीकारकांना घडवले. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि स्वाभिमानाने जगण्याचा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या विचारांची ज्योत आजही समाजाला समता, बंधुता आणि न्यायाच्या मार्गावर चालण्याची दिशा देते. क्रांतीगुरूंना प्रणाम करीत असताना गावाचे सरपंच रामदास पाटील खांडेभराड, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायतचे कर्मचारी व गावातील ज्येष्ठ नागरिक व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

क्रांती गुरू लहुजी साळवे विकास परिषद ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष आर्सुड, आण्णा आर्सुड, योगेश आर्सुड, राहुल आर्सुड, रमेश आर्सुड, रामु सर, लबडे गणेशराव लबडे, सुरेश नाना लबडे, आकिल शेख, गणेश खांडेभराड, नारायण आतराय, कुंडलीत चोधरी, प्रभू लबडे, विनायक लबडे, गणेश गायकवाड, कुंडलीक लबडे, गणेश शेलार, संतोष ताटू, सुभाष आन्ना खांडेभराड व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## || थोडक्यात



**जालना : महानगरपालिकेच्या महापौरपदी वंदनाताई मगरे, उपमहापौरपदी राजेश राऊत यांची निवड झाल्याने, जालन्याचे उद्योजक व सजासेवक घनश्याम सेठ गोयल यांनी या दोघांचा सत्कार केला. यावेळी गोपाल गोयल, सचिन मगरे उपस्थित होते.**

### भीषण अपघातात होमगार्ड जवानासह आईचा जागीच मृत्यू

जामखेड। प्रतिनिधी

महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी दर्शनासाठी निघालेल्या मायलेकावर काळाने झडप घातली. कल्याण-निर्मल राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी फाटा येथे दुचाकी व हुंदई कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात उमेश जगन्नाथ औटी (वय ४४) आणि त्यांच्या आई कौशल्या जगन्नाथ औटी (वय ६६, रा. औटीवस्ती, पाथर्डी) यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेने पाथर्डी शहर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महाशिवरात्रीनिमित्त उमेश औटी हे आपल्या आई कौशल्या औटी व मुलासह दुचाकीवरून पाथर्डी तालुक्यातील तोंडोळी येथील हरिहरेश्वर मंदिरात दर्शनासाठी निघाले होते. कोरडगाव रोडवरील टाकळी फाटा येथे समोरून येणाऱ्या हुंदई कारची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की, उमेश औटी व कौशल्या औटी यांना गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना अहिल्यानगर येथे हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या दुर्घटनेत सोबत असलेली लहान मुलगी सुदैवाने बचावली. उमेश औटी हे पाथर्डी होमगार्ड दलात कार्यरत होते. कर्तव्यनिष्ठ व मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वत्र परिचित होते. होमगार्डच्या सेवेसोबतच ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीच आई-मुलाचा दुर्दैवी अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताची नोंद पाथर्डी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### कमिशनच्या वादातून गुत्तेदारावर कुऱ्हाडीने हल्ला

परभणी। प्रतिनिधी

परभणी शहरातील जेल कॉर्नर परिसरात एका शासकीय गुत्तेदारावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. सुशोभीकरण कामाच्या कमिशनच्या पैशांवरून झालेल्या वादातून हा प्रकार घडल्याची माहिती जखमीने दिली आहे. या हल्ल्यात कंत्राटदारास गंभीर दुखापत झाली असून त्यांचा मित्रही जखमी झाला आहे. मोहंमद वाजेदअली यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शासकीय गुत्तेदार असून त्यांना वॉर्ड क्र. ९ मधील सुशोभीकरणाचे सुमारे २० लाख रुपयांचे काम मिळाले होते. या कामासाठी संबंधित ठिकाणच्या मुजावराने ३० टक्के कमिशनची मागणी केल्याचा आरोप जखमीने केला आहे. काही रक्कम ऑनलाइन व रोख स्वरूपात दिल्यानंतरही अधिक पैशांची मागणी व वारंवार फोनवरून धमक्या दिल्या जात असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. रविवारी सकाळी अनोळखी क्रमांकावरून फोन करून संशयिताने शिवीगाळ करत भेटण्यास सांगितले. त्यानंतर जेल कॉर्नर येथील पानपट्टीवर पाणी पिण्यासाठी फिर्यादी थांबले असता संशयिताने वाद घालत मारहाण केली. या झटापटीत कंत्राटदाराची उजव्या बाजूची दाढ तुटली. त्यानंतर संशयिताने मोटारसायकलवरून कुऱ्हाड मारून डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. वार चुकवताना कुऱ्हाडीचा फटका पाठीवर बसल्याने ते गंभीर जखमी झाले. मोटारसायकलवरून पळ काढल्याने वाचला जीव मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या शेख मजहर यांनाही कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी करण्यात आले. दोघांनीही तेथून मोटारसायकलवरून पळ काढून जीव वाचवला. जखमीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पठाण अहमद अली खान नवीयार खान याच्यावर नानलपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पळशीत शिवजयंती निमित्त कार्यक्रमांची रेचलेल

पळशी। प्रतिनिधी

पळशी येथे शिवजयंतीच्या निमित्ताने ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात सुप्रसिद्ध मार्गदर्शक विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान होणार आहे. शिवस्वराज्य प्रतिष्ठान आणि शिवजन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर आणि स्पर्धा परीक्षांविषयी योग्य दिशा मिळावी हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पोलिस, आर्मी व इतर भरती प्रक्रियांसाठी तयारी करणाऱ्या युवकांसह शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हे मार्गदर्शन उपयुक्त ठरणार आहे. अभ्यास करताना येणाऱ्या अडचणींवर मात कशी करावी, स्वप्नपूर्तीसाठी सातत्य आणि नियोजनाचे महत्त्व काय, तसेच वैयक्तिक विकासासाठी आवश्यक सवयी कोणत्या याबाबत कांगणे मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि व्यावसायिक क्षेत्रातील संधींबाबतही माहिती दिली जाणार आहे. पळशीसह परिसरातील नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा हा उपक्रम ठरणार आहे.

# बारावी फिजिक्सच्या पेपरला मास कॉपी

वाशिम। प्रतिनिधी

वाशिम जिल्ह्यातील बारावीच्या परीक्षा केंद्रावर मास कॉपीचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या परीक्षा केंद्रावर सोमवारी झालेल्या फिजिक्स अर्थात भौतिकशास्त्राच्या परीक्षेला उपस्थित सर्वच्या सर्व ५८१ विद्यार्थ्यांनी एकसारखीच उत्तरे लिहिल्याची बाब निदर्शनास आली आहेत. सामूहिक कॉपीच्या या प्रकारामुळे राज्यात एकच खळबळ माजली आहे. राज्यात सध्या बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी फिजिक्सचा पेपर होता. त्यात भरारी पथकाने वाशिम जिल्ह्यातील श्री मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय (क्रमांक ०९०६), टो - जुमडाफाटा येथे धाड टाकली. त्यात परीक्षा सुरू असताना केंद्रावर सामूहिक कॉपी सुरू असल्याची बाब भरारी पथकाच्या निदर्शनास आली. यासंबंधीच्या माहितीनुसार, भरारी पथकाने १६ फेब्रुवारी दुपारी १२.३० च्या सुमारास या परीक्षा केंद्राला भेट दिली. केंद्रावर केऊण ५८४ विद्यार्थ्यांची नोंदणी होती. त्यापैकी ५८१ विद्यार्थी परीक्षेला प्रत्यक्ष हजर होते. पथकाने त्यांच्या उत्तरपत्रिकांची नमुना तपासणी केली, तव्हा अधिकारीही चक्रावून गेले.

परीक्षेला उपस्थित असणाऱ्या सर्व ५८१ विद्यार्थ्यांची उत्तरे शब्दशः एकसारखीच होती. जणूकाही सर्व विद्यार्थ्यांनी एकाच स्त्रोतातून उत्तरपत्रिका कॉपी केली होती. काही उत्तरपत्रिकांवर तर वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी पेन व पेन्सिलने विशिष्ट खुणाही केल्याच्या आढळल्या आहेत. भरारी पथकाच्या कारवाईत या परीक्षा केंद्रावरील विदारक स्थितीही समोर आली आहे. या परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींना अत्यंत दाटीवाटीने बसण्याची व्यवस्था आहे. याशिवाय त्यांच्या बसण्याची व्यवस्था टिनशेडमध्ये करण्यात आली आहे. अपुरी प्रकाशयोजना, पंखे व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कमतरता, तसेच वीज खंडित झाल्यास जनरेटरची सुविधा नसल्याचेही स्पष्ट केले. या केंद्रावर केवळ ८ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते. उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनीही या परीक्षा केंद्राला भेट दिली होती. भरारी पथकाच्या तपासात एक कर्मचारी मोबाईल फोन घेऊ परीक्षा केंद्रात फिरत असल्याचे निदर्शनास आले. मोबाईल तपासणीस टाळाटाळ केल्यानंतर अखेर २ मोबाईल ताब्यात घेण्यात आले. पुढील कारवाईसाठी ते संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. बैठे पथकातील सदस्यांनीही आपल्या अहवालात उपस्थित ५८१ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कॉपी केली आहे, असे नमूद केले आहे. भरारी पथकाचा अहवाल, उत्तरपत्रिकांची तपासणी, सीसीटीव्ही फुटेज, अपुऱ्या भौतिक सुविधा आणि संबंधित कर्मचाऱ्याकडे आढळलेले मोबाईल यावरून केंद्र क्रमांक ०९०६ येथे सामुदायिक कॉपी झाल्याचे स्पष्ट होत असून, या प्रकरणी शिक्षण विभागाकडून कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबन व गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

# उमरगा बसस्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य

## दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त, प्रवेशाद्वारावर गटारीचे पाणी साचल्याने प्रवाशांचा आरोग्याबाबत धोका

उमरगा। प्रतिनिधी

उमरगा शहर हे महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील शेवटचे शहर असून, येथील बाजारपेठ नेहमी गजबजलेली असते. हे शहर राष्ट्रीय महामार्गांवर असल्याने येथील बसस्थानकामध्ये नेहमी गर्दी असते. बसस्थानकाच्या प्रवेशद्वारा जवळच घाणीचे साम्राज्य पसरले आहे. बसस्थानक परिसरात घाणीचा विळखा बसला असून, बसस्थानकाच्या समोरूनच शहरातील सांडपाण्याची मोठी गटार गेल्यामुळे बसस्थानाकाच्या डावीकडील प्रवेशद्वाराजवळ गटारीचे पाणी साचल्याने जंतूसंसर्ग आणि दुर्गंधीमुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. एसटी महामंडळ अथवा बसस्थानक प्रमुख याबाबत उदासीन असून, या समस्याकडे गंभीरपणे पाहत नसल्याचे दिसून येत आहे.

बसस्थानकावर ग्रामीण भागात जाणारे शेकडो प्रवासी येथील वाट पाहत तासन्तास उभे असतात. या गटारीच्या पाण्यामुळे दुर्गंधी सहन करावी लागत आहे. ग्रामीण भागातील शाळेला आलेले विद्यार्थी यांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. बसस्थानक परिसरात असलेल्या स्वछता गृहाची दुरवस्था झाली असून, त्याची वेळोवेळी स्वच्छता केली जात नाही. स्वच्छतागृहांची झालेली दुरवस्था, बसस्थानक परिसरातच तुंबत असलेले स्वच्छतागृहांचे सांडपाणी, बंद पाण्याच्या टाकीजवळील घाण, बसस्थानकात मधील खांबाच्या कोपऱ्यातील थुंकीचे फवारे यामुळे बसस्थानकाला अवकळा आली आहे. या घाणीच्या समस्ये बाबत वारंवार विचारणा करूनही वरिष्ठाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. येथील काही दुकानदार दुकानातील कचरा दररोज बसस्थानक आवारात टाकतात. त्यामुळे आवारात कचरा तसाच साचून राहतो. हा कचरा संबंधित विभागाकडून उचलला जात नाही. उमरगा शहरात कुठेही पार्किंगची व्यवस्था नाही. बाहेर गावाहून येणाऱ्या चारचाकी गाड्या उमरगा बस स्थानकात पार्किंग केल्या जातात. काही गाड्या तर बस लावण्याच्या बाजूला पार्किंग केल्या जातात. याचाच फायदा घेऊन खाजगी ॲटो चालक सुद्धा बसस्थानक्कामध्ये आपली वाहने लावून प्रवाशी वाहतूक करीत आहेत. याबाबत आगार प्रमुखांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. प्रवेशद्वाराजवळील घाणी व दुर्गंधीबद्दल प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण उमरगा शहरातील गटारी येथून जात आहे. जोपर्यंत गटारीचे काम होतं नाही तोपर्यंत याबाबत काही उपाययोजना करता येणार नाही. बसस्थानक परिसरातील अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनावर कार्यवाही करण्यात येईल.

# स्वीकृत नगरसेवकपदी शरद मोरे, सतीश बोराडे बिनविरोध





मंठा। प्रतिनिधी

येथील नगरपंचायतीत सोमवारी (ता. १६) स्वीकृत सदस्य निवडीकरिता विशेष बैठक बोलाविण्यात आली होती. यावेळी शरद मोरे व सतीश बोराडे या दोघांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुख्याधिकारी सुरज बिस्किटे यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली असून दोन्हीही नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष छायाताई वाघमारे, नगरसेवक यमुनाताई दवणे, नंदाताई राठोड, मीनाताई बोराडे, दीपक बोराडे, विकास सूर्यवंशी, अरुण वाघमारे, बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे, माजी नगराध्यक्ष नितीन राठोड, नगरसेवक राजेश खंदारे, जे.के. कुरेशी, सचिन बोराडे, उबेद बागवान, गंगाराम गवळी, अशोक अवचार, गणेश वाघमारे, विष्णू वाघमारे, दिगंबर कोळी, महादेव खरात, रमेश ठोके नीलेश मोरे, बाळासाहेब वांजोळकर यांची उपस्थिती होती.

# जालना जिल्ह्यातील १ लाख १२ हजार विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये दप्तर योजना

परतूर। प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता १ ते ८ वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय शुक्रवारी शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे. या निर्णयाचा फायदा जालना जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या १ लाख १२ हजार ६४२ विद्यार्थ्यांना होणार आहे, ज्यात ५३ हजार ४३० मुले आणि ५९ हजार २१२ मुली यांचा समावेश आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम-२००९ १ एप्रिल २०१० पासून लागू झाला आहे. याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार शाळांमध्ये आनंददायी व उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. या संदर्भात शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण तज्ञ आणि पालकांशी केलेल्या चर्चेतून विद्यार्थ्यांना



मोफत दप्तर उपलब्ध करून देण्याचा विचार पुढे आला होता. राज्यशासनाच्या वतीने सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत दुपारचे जेवण दिले जाते.

या योजनांच्या सोबतीला मोफत दप्तर योजना सुरू केल्यास पटनोंदणी व उपस्थिती वाढण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. राज्यातील पुणे आणि बृहन्मुंबई महानगरपालिका मार्फत विद्यार्थ्यांना मोफत दप्तर दिले जाते. वरील दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांसह ज्या संस्थांमध्ये अशा प्रकारे मोफत दप्तर दिले जाते त्यांना वगळून इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ही योजना राबविली जाणार आहे. सदरील योजना राबविण्यासाठी राज्यस्तरावर १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची निवड केली जाणार आहे. जिल्ह्यातील भोकरदन २९१, जाफराबाद १४५, जालना २३५, बदनापूर १५२, अंबड २०५, घनसावंगी १६८, परतूर १२५, मंठा १४३ या प्रमाणे शाळांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. सर्वांना सारखे दप्तर वाटप करण्यात आले पाहिजे ग्रामीण भागातील अनेक पालक आपल्या मुलांना चांगले दप्तर घेऊन देऊ शकत नाहीत. परिणामी अनेक विद्यार्थी बियाण्यासाठी आलेल्या पिशव्यांचा वापर दप्तर म्हणून करतात. काही विद्यार्थ्यांचे चांगले दप्तर तर काहींना बियाण्याच्या रिकाम्या पिशव्या यांच्या यातून न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते.

या योजनेतून सर्वांना सारखे दप्तर मिळाल्यास समानतेची भावना वाढीस लागण्यास मदत होईल. असे आंब्याचे केंद्रप्रमुख शंकर पोटे यांनी सांगितले. अन्यथा ग्रामीण भागात रोष खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे. विशेषतः ग्रामीण भागातील खाजगी अनुदानित शाळांमधील हे प्रमाण अधिक आहे. सदरील योजनेतून अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना वगळल्यास पालकांमध्ये रोष निर्माण होईल. पालक आणि विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन शासनाने सदरील योजना खाजगी अनुदानित शाळांमध्ये देखील लागू करावी.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ | ६

# जिल्ह्यात १८०० ग्रामपंचायती त्यात १२१९ दारूची दुकाने

## आणखी दारू दुकानाचे प्रस्ताव दाखल; प्रशासन मंजुरीच्या तयारीत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दारुने मोठे नुकसान झालेले आहे. राज्यात सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यामध्ये होत आहेत. अशा परिस्थितीत दारू आणखी विकली गेली तर त्याचे समाज विघातक परिणाम होतील. बीड जिल्ह्यात होलसेल दारू दुकाने. बियर बार. बिअर शॉपी. देशी दारू दुकाने यांची संख्या जवळपास साडेबाराशे इतकी आहे. त्यातच दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात होणाऱ्या बैठकीत आणखी दुकाने मंजूर झाली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी आता एकही दारू दुकानाला मंजुरी देऊ नये, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक मा.



अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये दारू दुकानांना मंजुरी देऊ नये, म्हणून आम्ही सातत्याने प्रयत्न केला आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यात आजपर्यंत दुकान दिल्याची माहिती आम्हाला मिळालेली नाही. त्याचप्रमाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे देखील काम चांगले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेसाठी केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. अशा परिस्थितीत या अधिकाऱ्यांनी दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी देखील लक्ष देणे गरजेचे आहे.

**बीड जिल्ह्यात आज मित्तीला ८१६ बियर बार, ३१४ बिअर शॉपी, ७८ देशी दारूची दुकाने आणि दारू विक्रीची होलसेल ११ दुकाने अशी एकूण १२१९ (बाराशे एकोणवीस) दुकाने आहेत. जिल्ह्यात ग्रामपंचायतींची संख्या १८०० च्या घरात आहे. जर आता आणखी दुकाने मंजूर होत गेली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती होईल.**

दारूमुळे कुटुंब उध्वस्त होतात. ग्रामीण भागाला याचा मोठा तडाखा बसलेला आहे. घरातला एक माणूस दारूडा निघाला तर काही पिढ्या त्याचे परिणाम भोगतात. त्यामुळे दारुड्यांची संख्या कमी होणे गरजेचे आहे. म्हणून दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न असतो.

जिल्ह्यात या दुकानांशिवाय बेकादेशीर रीतीने दारू विकणारे हजारावर दुकाने आहेत. जिल्ह्याला अगोदरच ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून पाहिले जाते. जिल्ह्यात मोठे उद्योग नाहीत. बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचबरोबर गुंडगिरीने देखील कळस गाठला आहे. आणखी दारू विक्री वाढली तर आणखी गुन्हेगारी वाढेल, अशी चिन्ह आहेत.दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दारू दुकानांना परवाने द्यायचे किंवा नाही याबाबतची बैठक जिल्हाधिकारी यांनी बोलवली असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. या दिवशी एकाही दुकानाला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात आले असून एकही दुकान मंजूर होणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करु. दारू दुकान मंजूर करणे हा नियम असला तरी समाजाचा विचार करायला हवा, असे ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# आस्ट्रेलिया आऊट झिंबाब्वे इन...

हा मजकूर लिहीपर्यंत बलाढ्य आस्ट्रेलियन संघ टी.२० विश्वकप क्रिकेट स्पर्धेतून बाद झाला आहे. आयर्लंड विरुद्धचा झिंबाब्वेचा आजचा श्रीलंकेत आयोजित सामना पावसामुळे रद्द झाला असून दोन्ही संघाना प्रत्येकी एक एक गुण देण्यात आला आहे.अर्थात याचा जबरदस्त फटका कांगारूना बसलाय.बरे झाले विश्वचषक जिंकून त्यावर पाय ठेवून बसणाऱ्या या संघाला नियतीने आणि त्यांच्या कर्माने धडा शिकवला आहे.श्रीलंकेसोबतच आता झिंबाब्वे संघ देखील सुपर-८ मध्ये पोहचला आहे.




दरम्यान आज झालेला कॅनडा विरुद्ध न्यूझीलंड सामना अपेक्षेप्रमाणे न्यूझीलंडने ८ गडी राखून जिंकला पण या सामन्यात भारतीय वंशाच्या युवराजसिंग सामरा या सलामीच्या फलंदाजाने आक्रमक शतक झळकावले. त्याने ६५ चेंडूत ११ चौकार आणि ६ षटकार मारत १६९.२३ च्या स्ट्राईक रेटने ११० धावा काढल्या.या जोरावर कॅनडा संघाने ४ बाद १७३ धावा काढल्या हे लक्ष्य न्यूझीलंडने १५.१ षटकात अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात पार करून आपला सुपर-८ मधील प्रवेश निश्चित केला.आता पर्यंत या स्पर्धेत दोन शतके झाली आहेत त्यात एक आहे कॅनडाच्या युवराजसिंगचं तर दुसरं काल श्रीलंकेच्या पथुम निस्संका याचं.

काल पल्लेकेलेच्या मैदानावर श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाचा जो काही कचरा केला ते बघून जुन्या श्रीलंकन संघाची आठवण झाली.प्रथम फलंदाजी करणाऱ्या आस्ट्रेलियाची १०४ धावांपर्यंत एकही विकेट गेली नव्हती, पण त्यानंतर श्रीलंकेच्या गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला असं काही नाचवलं की पुढच्या ७७ धावांत अख्खी टीम तंबूत परतली. पथुम निस्संकाने हवेत झेप घेत ग्लॅन मॅक्सवेलचा जो चित्तथराक एक हाताने झेल घेतला, तो पाहून तर अंगावर काटाच आला.हा झेल या स्पर्धेतील सर्वोत्तम झेल ठरावा. याच निस्संकाने मग फलंदाजी करतांना अवघ्या ५२ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा झोडपून काढल्या. आणि या वर्ल्ड कपमधलं पहिलं शतक साजरं आणि १८२ धावांचं लक्ष्य श्रीलंकेने आरामात पार केलं.तो इतका सहजसुंदर खेळत होता की वाटावं हा गल्लीत खेळतोय.कोणताही गोलंदाज त्याला साधं बिट देखील करू शकला नाही. वाटेल तेव्हा चौकार आणि वाटेल तेव्हा षटकार मारण्याच्या सहजतेने त्याने नेत्रदीपक फलंदाजी केली.विशेष म्हणजे सध्या श्रीलंका संघाचे प्रशिक्षक आहेत आक्रमक फलंदाजीसाठी ओळख निर्माण केलेले सनथ जयसूर्या. तर फलंदाजीचे प्रशिक्षक आहेत भारताचे विक्रम राठोड. हात आहे, जयसूर्या जेव्हा मैदानात उतरायचा, तेव्हा त्याने आपल्यासारख्या करोडो क्रिकेटप्रेमींना आक्रमक फलंदाजीचा जो आनंद दिलाय, तो शब्दात सांगता येणार नाही.श्रीलंकेचा सुपर-८ मध्ये दिमाखात प्रवेश झाला आहे.या विश्वकप स्पर्धेचे दोन्ही यजमान संघ दिमाखात सुपर-८ मध्ये पोहचलेत.



**-महेश वाघमारे, बीड.**

# शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त 'मराठा भूषण' पुरस्कार ॲड. प्रकाश कवठेकर यांना जाहीर

बीड । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ, बीड जिल्हा यांच्या वतीने शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त उद्योग, सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ॲड. प्रकाश विठ्ठलराव कवठेकर यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'मराठा भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या विविध क्षेत्रांतील भरीव योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.



ॲड. कवठेकर यांनी १९९३ मध्ये छावा संघटना चे शाखाप्रमुख म्हणून कार्यास प्रारंभ केला. संघटनात्मक बळकटी, युवकांमध्ये जनजागृती आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर त्यांनी पुढे २०१२ पर्यंत प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

उद्योग क्षेत्रात २००६ साली त्यांनी तेजस ग्रुपची स्थापना करून तेजस इलेक्ट्रिकल्स अँड सप्लायर्सच्या माध्यमातून विद्युत विभागात विविध प्रकल्प पूर्ण केले. गुणवत्तापूर्ण कामामुळे उद्योग क्षेत्रात त्यांनी विश्वासार्ह स्थान निर्माण केले. २०१६ मध्ये तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ची स्थापना करून सहकार क्षेत्रात सामान्य नागरिकांना आर्थिक बळ देण्याचे कार्य सुरू केले. २०२१ साली ऑक्सितेज मिनरल वॉटर उद्योग सुरू करून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

राजकीय क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. २०१७ साली ◀◀ पान ३ वर

# नेकनूर, चौसाळा, लिंबागणेश येथे शासकीय रुग्णालयात डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त फळ वाटप

बीड । प्रतिनिधी

लोकनेत्या माजी खासदार डॉ. प्रीतमताईसाहेब मुंडे यांचा वाढदिवस भाजप बालाघाट मंडळातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांच्या पुढाकाराने नेकनूर, चौसाळा व लिंबागणेश येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. रुग्णालयातील विविध समस्यांबाबत अशोक रसाळ यांनी



ताईसाहेबांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून माहिती दिली.

या समाजोपयोगी उपक्रमात बालाघाट मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. लिंबागणेश येथे गणपती आरती करून ताईसाहेबांना निरोगी व उदंड आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी भाजप बीड तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांच्यासह तालुका उपाध्यक्ष रवीजी काळे, ◀◀ पान ३ वर

# सोनेगाव फाटा ते पाचंग्री रस्ता काम संथगतीने

## धुळीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील सोनेगाव फाटा ते पाचंग्री या महत्त्वपूर्ण रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने परिसरातील नागरिक आणि प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याचे काम अर्धवट आणि उघड्या अवस्थेत असल्याने या मार्गावर धुळीचे लोट उसळत असून, यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



धुळीमुळे श्वसनाचे आजार बळावले

या रस्त्यावरून वाहनांची सतत वर्दळ असते. रस्ता खणून ठेवल्यामुळे आणि त्यावर खडीकरण न झाल्यामुळे वाहने जाताना प्रचंड धूळ उडते. या सततच्या धुळीमुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांना फुफ्फुसांचे विकार, दमा, खोकला आणि डोळ्यांच्या जळजळीसारख्या आजारांनी ग्रासले आहे. स्थानिकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, घरात आणि दुकानांमध्येही धुळीचे थर साचत असल्याने जगणे कठीण झाले आहे.

शेतपिकांचेही प्रचंड नुकसान

केवळ मानवी आरोग्यच नव्हे, तर ◀◀ पान ३ वर




# मादळमोही ग्रामपंचायतीकडून ५० दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी तीन हजार रुपयांच्या निधीचे वाटप

गेवराई । प्रतिनिधी

सामाजिक न्यायाची भूमिका प्रत्यक्ष कृतीत उतरवत मादळमोही ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे यशस्वी वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत गावातील ५० दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ३००० रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.

दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि ◀◀ पान ३ वर

# सोशल मीडियावरील स्टोरीचा वाद जीवावर बेतला; रुईनालकोलमध्ये तरुणाचा खून, दोघे गंभीर

कडा । प्रतिनिधी

सोशल मीडियावर एकमेकांच्या विरोधात स्टेटस आणि 'स्टोरी' टाकण्याच्या किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद भीषण हाणामारीत बदलल्याची धक्कादायक घटना रुईनालकोल (ता. आष्टी) येथे सोमवारी रात्री घडली. या घटनेत २० वर्षीय तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला असून त्याचे दोन मित्र गंभीर जखमी झाले आहेत.



रुईनालकोल येथील जिल्हा परिषद शाळेसमोर सोमवारी रात्री तरुणांचे दोन गट आमनेसामने आले. इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर एकमेकांच्या विरोधात टाकलेल्या 'स्टोरी'वरून गेल्या काही दिवसांपासून दोन्ही गटांत कुरापती सुरू होत्या. सोशल मीडियावरील हा वाद अखेर प्रत्यक्षात भिडला आणि त्याचे रूपांतर रक्तरंजित हाणामारीत झाले.

रागाच्या भरात एका गटातील तरुणांनी धारदार शस्त्राने दुसऱ्या गटातील तिघांवर सपासप वार केले. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

एकाचा मृत्यू, दोघांची प्रकृती चिंताजनक

या हल्ल्यात दीपक शिवाजी नालकोल (वय २०, रा. रुईनालकोल) हा तरुण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे.तर, त्याच्यासोबत असलेले अन्य दोन तरुणही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात उपचार ◀◀ पान ३ वर

# लहू महाराज बहिर यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हॉटेल रायगडचे मालक लहू महाराज बहिर यांचे वडील विठ्ठल सोनाजी बहिर(अण्णा) यांचे वयाच्या नव्वदच्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुली, दोन मुलं, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर त्यांच्या राहत्या गावी बीड तालुक्यातील शिरापूर गात येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.



जुन्या पिढीतील मनमिळावू व्यक्तिमत्व विठ्ठल सोनाजी बहिर यांनी आपल्या गावातून हॉटेल व्यवसायाला सुरुवात केली. आज त्यांचे बीड शहरांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य असे रायगड हॉटेल आहे. मुलांना वारकरी संप्रदायाचे संस्कार केलेले असल्याने त्यांचा सर्व परिवार हा वारकरी संप्रदायाशी निगडित आहे. विठ्ठल (अण्णा) बहिर हे काही दिवसापासून आजारी ◀◀ पान ३ वर

# एसटी विभागाचा नवा डिजिटल युगारंभ

## नॅशनल कॉमन स्मार्ट कार्डची मोबिलिटी अनिवार्य?

आष्टी । प्रतिनिधी

तमाम महाराष्ट्रातील विद्यार्थी तरुण तसेच तांत्रिक विभागातील तरुण विद्यार्थी व अमृत योजनेतील वृद्ध महिला आणि वर्धांना प्रवास सुखकर करण्यासाठी परिवहन मंत्री आदरणीय सरनाईक यांनी सवलत धारकासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाची नवी पहाट उगवत रोख व्यवहाराच्या पलीकडे जाऊन पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड प्रणाली लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे अशी माहिती आदरणीय परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक साहेब यांनी प्रारित केली असून याची अंमलबजावणी लवकरच होणार असल्याचे मत आष्टी आगाराचे आगार प्रमुख श्रीमान प्रेमचंद चौथमल यांनी प्रसिद्धी पत्रकात जाहीर केले आहे

या ऐतिहासिक योजनेतून प्रवाशांना नसून विश्वासाला डिजिटल देणारे पाऊल सवलतीची अचूक नोंद पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोप विरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार मध्ये सामावल्या जाणार आहेत या प्रवासासाठी महामंडळाने मे, एबिक्स टेक्नॉलॉजी लिमिटेड आणि एन सी डी एल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून लवकरच सर्व आगारात नोंदणी मोहीम सुरू होणार असल्याचे आगारप्रमुखांनी जाहीर केले असून या योजनेत राज्यातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे शालेय तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या त्यांच्या सरळ क्रमांकला जोडलेले कार्ड दिले जाणार असून ◀◀ पान ३ वर

# परळी महादेव मुंडे हत्या प्रकरण: नार्को आणि ब्रेन मॅपिंग चाचणीतून सत्य बाहेर येईल; आ. सुरेश धस यांचा विश्वास

**पाटोदा । प्रतिनिधी**

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरण सध्या संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकरणातील तपासाबाबत बोलताना भाजप आमदार सुरेश धस यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणातील आरोपींना शोधण्यासाठी सुरू असलेल्या ब्रेन मॅपिंग आणि नार्को टेस्टच्या अहवालातून जे सत्य समोर येईल, त्यानंतर एसआयटी (डखढ) दोषींवर कठोर कारवाई करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, महादेव मुंडे हत्या प्रकरणात सध्या तांत्रिक तपास अत्यंत वेगाने सुरू आहे. ब्रेन मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण झाली असून नार्को टेस्ट देखील केली जात आहे. या चाचण्यांमध्ये जे कोणी 'पॉझिटिव्ह' आढळतील, त्यांना एसआयटी तात्काळ ताब्यात घेईल. आम्हाला एसआयटी आणि राज्याच्या गृहखात्यावर पूर्ण विश्वास असून, दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल.

**सुरुवातीला पोलिसांवर होता प्रचंड दबाव?**

तपासाच्या सुरुवातीच्या टप्प्याबाबत भाष्य करताना धस म्हणाले की, सुरुवातीला या प्रकरणातील पोलिसांवर प्रचंड दबाव होता. त्यामुळे ज्या मोकळेपणाने जबाब नोंदवले जायला हवे होते, ते झाले नाहीत. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. आयपीएस पंकज कुमावत यांनी ज्ञानेश्वरी मुंडे यांचा पुरवणी जबाब नोंदवला असून आता खंबीरपणे तपास पुढे सरकत आहे.

सत्य समोर येईपर्यंत संयम राखणे गरजेचे

या प्रकरणातील संवेदनशीलतेवर बोट ठेवत धस यांनी स्पष्ट केले की, सध्या तपास निर्णायक टप्प्यावर आहे. नार्को आणि ब्रेन मॅपिंगचे निकाल हाती आल्यानंतरच या हत्याकांडाचा खरा चेहरा समोर येईल. त्यामुळे एका दिवसाचा संयम बाळगून अहवालाची प्रतीक्षा करणे महत्त्वाचे आहे, तोपर्यंत यावर अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असेही ते म्हणाले.आता या संपूर्ण प्रकरणाचे लक्ष नार्को टेस्टच्या अहवालाकडे लागले असून, एसआयटी कोणावर कारवाई करणार याकडे परळीसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# कर्डिले, रेडेकर, जगताप, ठोंबरे जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकार पुरस्काराचे मानकरी

आष्टी । प्रतिनिधी

सध्याच्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या काळात सुद्धा प्रिंट मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बरोबरीने काम करताना दिसून येत आहे. प्रिंट मीडियाच्या माध्यमातून एक शाश्वत बातमी लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम पत्रकार नेहमी करत असतात. सध्याच्या काळात इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे वाचक जरी कमी झाले असले तरी लाखो वाचक आजही वृत्तपत्र वाचतात.



प्रिंट मीडियाने आजपर्यंत लाखो लोकांचा बातमी बाबतचा विश्वास संपादन केला आहे. यामुळे लाखो लोक वृत्तपत्र वाचनास पसंती देतात. याचाच एक भाग म्हणून प्रिंट मीडियाचा पत्रकार नेहमी हा खोलाशी जाऊन सविस्तर बातमीचे लेखन करून लाखो लोकापर्यंत ती बातमी गेली पाहिजे आणि प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या बातमीने विश्वास संपादन केला पाहिजे यासाठी प्रयत्न करतात असाच विश्वास संपादन करत असताना पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो परंतु तो सामना करत असताना पत्रकार कधीही डगमगत नाही वेळोवेळी प्रत्येक विषयाला वाचा फोडण्याचे काम पत्रकार आपल्या माध्यमातून करत असतो या पत्रकाराची समाजामध्ये कोणीतरी दखल घेईन हा विश्वास पत्रकारांमध्ये असतो त्या विश्वासाच्या बळावरतीच पत्रकार नेहमी आपलं काम करत राहतो. आपल्या पाठीवरती शाबासकीची थाप मिळेल की नाही माहित नाही पण काम करत राहणे हा पत्रकाराचा मुख्य उद्देश असतो. अशीच कौतुकाची थाप म्हणून आष्टी तालुक्यातील दैनिक पुण्यनगरी व दैनिक लोकप्रश्न चे आष्टी तालुका प्रतिनिधी रघुनाथ कर्डिले, दैनिक राज्य लोकतंत्रचे तालुका प्रतिनिधी शरद रेडेकर, दैनिक बीडसत्ताचे तालुका प्रतिनिधी अमोल जगताप तसेच अतुल्य महाराष्ट्राचे आदिनाथ ठोंबरे हे जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकार पुरस्काराचे मानकरी ठरले असून. त्याची घोषणा दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिनी करण्यात आली असून. लवकरच त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल असे जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार समितीचे मार्गदर्शक ॲड सीताराम पोकळे यांनी कळविले आहे. जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्यामुळे या सर्वांचे आष्टी तालुका पत्रकार संघ, युवा पत्रकार संघ तसेच पत्रकार महासंघ व मित्रमंडळींनी अभिनंदन केले आहे. लवकरच आष्टी येथे एका कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याचे समितीने कळविले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विमानाची शेपटी पूर्णपणे सुस्थितीत, मग ब्लॅक बॉक्स जळला कसा ? मिटकरींचा सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाला होता. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर अजित पवार यांच्या विमानाचा अपघात की घात असा सवाल उपस्थित केला जात आहे. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी देखील काही शंका उपस्थित केल्या आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी देखील शंका उपस्थित केल्या आहे. मिटकरींनी विमान अपघाताचा फोटो शेअर करत ब्लॅक बॉक्ससंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. 'विमानाची टेल पूर्णपणे सुस्थितीत, त्यामुळं ब्लॅक बॉक्सला काहीही डॅमेज होण्याचा संबंध येत नाही.', असे मत मिटकरी यांनी व्यक्त केले.

विमानाचा ब्लॅक बॉक्स हा त्याच्या टेलमध्ये, म्हणजे त्याच्या शेपटीमध्ये असतो. त्याचं कारणच हे असतं की, ज्यावेळी विमानाचा अपघात होतो, त्यावेळी अनेकदा असं निदर्शनास आलंय की, विमानाची टेल ही पूर्णपणे जळत नाही.





त्यामुळंच हा ब्लॅक बॉक्स विमानाच्या टेलमध्ये ठेवला जातो अपघात झाला त्या विमानाची शेपटी ही पूर्णपणे सुस्थितीत आहे. ती अजिबात जळालेली नाहीये. त्यामुळं या ब्लॅक बॉक्सला काहीही डॅमेज होण्याचा संबंध येत नाही. तसेच ब्लॅक बॉस असा बनवला गेला असतो की हाय टेम्परेचर मध्ये सुद्धा कितीही आग लागली तरीही ते जळून खाक होत नसतो. आता हा प्रश्न उपस्थित होतो की अपघात झाला त्या विमानाचा ब्लॅक बॉक्स कसा जळला? असा सवाल अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. अमोल मिटकरी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर अजित पवारांच्या विमान अपघातानंतरचा फोटो पोस्ट केला. या फोटोमध्ये त्यांनी विमानाच्या टेल म्हणजेच शेवटीच्या भागाला ॲरोने दाखवत अपघातानंतरही तो सुरक्षित असल्याचे दाखवले. त्यांनी या पोस्टमध्ये ब्लक बॉक्ससंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. विमानाचा ब्लॅक बॉक्स हा त्याच्या टेलमध्ये म्हणजे त्याच्या शेपटीमध्ये असतो. त्याचं कारणच हे असतं की, ज्यावेळी विमानाचा अपघात होतो, त्यावेळी अनेकदा असं निदर्शनास आलंय की, विमानाची टेल ही पूर्णपणे जळत नाही. त्यामुळंच हा ब्लॅक बॉक्स विमानाच्या टेलमध्ये ठेवला जातो. अपघात झालेल्या त्या विमानाची शेपटी ही पूर्णपणे सुस्थितीत आहे. ती अजिबात जळालेली नाहीये. त्यामुळं या ब्लॅक बॉक्सला काहीही डॅमेज होण्याचा संबंध येत नाही.

# विमान अपघातापूर्वी 'मेडे कॉल' का दिला नाही? तपासाची सुई आता 'या' दिशेला

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर लेअरजेट विमान लँडिंगदरम्यान रनवेच्या बाजूला कोसळून दुर्दैवी निधन झाले होते. या दुर्घटनेचा तपास सुरुवातीला बारामती पोलिसांकडून सुरू होता. मात्र, राज्य सरकारच्या आदेशानुसार हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान, नागरी उड्डाण मंत्रालयाची केंद्रीय यंत्रणा एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन कमिटी (एएआयसी) तांत्रिक बाबींच्या आधारे सखोल चौकशी करत असून, त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतरच सीआयडीच्या पुढील तपासाला ठोस दिशा मिळणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.मुंबईहून बारामतीकडे जात असताना संबंधित विमानात कोणता बिघाड झाला होता का, याचाही तपास



सुरू आहे. विमानाचे पायलट कॅप्टन सुमित कपूर असून को-पायलट म्हणून शांभवी पाठक कार्यरत होत्या. दोघांची पार्श्वभूमी, उड्डाणापूर्वीचे संपर्क, ड्युटी रेकॉर्ड, कॉल डिटेल्स, तसेच मानसिक स्थिती यांचीही सीआयडीकडून पडताळणी केली जात आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या प्राथमिक माहितीनुसार, विमानाला रन वेवर उतरण्याची परवानगी दिल्यानंतर पायलटकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

त्यानंतर अवघ्या एका मिनिटात एटीसीला रनवे परिसरात आगीचे लोळ दिसून आले. अपघातापूर्वी कोणताही 'मेडे कॉल' किंवा आपत्कालीन सूचना देण्यात आलेली नव्हती. त्यानंतर बारामतीतील गोजुबावी परिसरात विमान कोसळले आणि या भीषण दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. आता एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन कमिटीचा अंतिम अहवाल आल्यानंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता असून, त्यानुसार सीआयडी पुढील गुन्हेगारी तपासाची दिशा निश्चित करणार आहे.

# वडिलांसोबत पोहायला गेलेल्या १० वर्षांच्या कैवल्याचा विहिरीत बुडून मृत्यू

**खेड । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील घोटवडी गावाजवळ रविवारी (१५ फेब्रुवारी २०२६) दुपारी हृदयद्रावक घटना घडली. पोहण्यासाठी गेलेल्या १० वर्षीय मुलाचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. कैवल्य एकनाथ भोते (वय १०, रा. वाशेरे भोतेवाडी, ता. खेड) असे मृत मुलाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कैवल्य हा आपल्या वडील आणि भावासोबत पोहण्यासाठी गेला होता. जलजीवन मिशन अंतर्गत खोदलेल्या विहिरीत ते पोहत असताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने कैवल्यचा तोल गेला आणि तो खोल पाण्यात बुडाला. संबंधित विहीर सुमारे ४० ते ५० फूट खोल असल्याने शोधकार्य अत्यंत कठीण ठरत होते. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. मात्र विहिरीची खोली अधिक असल्याने स्थानिकांना प्रयत्न करूनही यश येत नव्हते. पोलीस पाटील यांनी तत्काळ पोलिसांना कळविले.



यानंतर खेड पोलिसांनी अग्निशामक दल आणि आपत्कालीन बचाव पथकाला घटनास्थळी पाचारण केले. रविवारपासून सोमवार दुपारपर्यंत शोधमोहीम सुरू होती, तरीही मुलाचा शोध लागत नव्हता. घटनास्थळी झालेली गर्दी पाहून वारंगवाडी येथील नागरिकांनी वन्यजीव रक्षक मावळ संस्थेशी संपर्क साधला. संस्थेचे सदस्य अविनाश कार्ले आणि संस्थापक निलेश गराडे यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने आवश्यक साहित्य घेऊन घटनास्थळी धाव घेतली. वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि शिवदुर्ग मित्र, लोणावळा यांच्या संयुक्त प्रयत्नातून अवघ्या दहा मिनिटांत मुलाला विहिरीतून बाहेर काढण्यात आले. या शोध मोहिमेत निलेश गराडे, गणेश गायकवाड, मयुर चौधरी, जिगर सोळंकी आणि राजेंद्र बंडगे यांनी सहकार्य केले. त्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी मृतदेह खेड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.या दुर्दैवी घटनेमुळे घोटवडी आणि परिसरात शोककळा पसरली आहे. लहानग्या कैवल्यच्या अकाली मृत्यूने भोते कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून गावकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

# पुणे पोलिसांची राजस्थानमध्ये सर्जिकल स्ट्राईक! ४ कोटींचे मेफेड्रॉन जप्त; आंतरराज्यीय ड्रग रॅकेट उद्ध्वस्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी मोहिमेत मोठे यश मिळवत राजस्थानपर्यंत कारवाई करून मेफेड्रॉन (एमडी) तस्करी करणारी आंतरराज्यीय टोळी उद्ध्वस्त केली. पोलिसांनी १ किलो ९६० ग्रॅम एमडी (चऊर्‍ऑीसी) जप्त करून सहा आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून एकूण ४ कोटी २७ लाख ०९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलीस उपायुक्त (परिमंडळ ४) सोमय मुंडे यांनी सांगितले, की पहाटे खराडी येथील ईऑन फेज-२ मागील गेटजवळ गस्तीदरम्यान पोलिसांनी पांढऱ्या स्वीफ्ट कारमधील दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या जवळून २७ ग्रॅम मेफेड्रॉन व साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी खराडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपी मोतीसिंह श्रवणसिंह राजपुरोहित व हरीश सुजना



रामदेवासी हे मूळ राजस्थानचे असून, वर्षभरापासून पुण्यात एमडी (चऊर्‍ऑीसी) विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र गोडसे व पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळपे यांच्या पथकाने तांत्रिक तपास सुरू केला.

त्यांनी ७ फेब्रुवारी रोजी वाघोली परिसरात सापळा रचून योगेश ऊर्फ मनीष बाबूराम बिष्णोई याला अटक करून त्याच्याकडून १५१ ग्रॅम एमडी (३० लाख २० हजार) जप्त करण्यात आले. पुढील कारवाईत सचिन ऊर्फ एस .के. रमेशकुमार बिष्णोई याच्याकडून ४ लाख ६५ हजार रोख व मोबाइल जप्त केला त्यानंतर मांजरी बुद्रुक येथे अमित सुनील घुले याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ३९८ ग्रॅम एमडी, फॉर्च्युनर वाहन व मोबाइल असा सुमारे १ कोटी दोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला. तपासाचा मुख्य धागा राजस्थानपर्यंत पोहोचल्याने विशेष पथके रवाना करण्यात आली. बालोतरा येथे मुख्य पुरवठादार रतनलाल किशणाराम जाठ याला अटक करून त्याच्याकडून १३८४ ग्रॅम एमडी (२ कोटी ७६ लाख) जप्त करण्यात आले.

फरार आरोपी रामकरण जाट ऊर्फ चौधरी ऊर्फ सियाग यालाही ताब्यात घेतले. या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी एकूण १ किलो ९६० ग्रॅम एमडी, रोख रक्कम, मोबाइल फोन व वाहन असा ४ कोटी २७ लाख ९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करत सहा आरोपींना अटक केली. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर आयुक्त मनोजकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त सोमय मुंडे, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे व सहाय्यक आयुक्त प्रांजली सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# बारामतीला मिळणार अपर जिल्हाधिकारी, तर चाकणला अपर तहसील कार्यालय

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जमीनविषयक दावे दाखल होण्याचे प्रमाण वाढल्याने दाव्यांची सुनावणी एकाच अधिकाऱ्याकडे होत असल्याने दावे निकाली निघण्याचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे निर्णयास दोन ते तीन वर्षे लागतात. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यासाठी नव्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन केले जाणार आहे, तर खेड तालुक्यात महसूल विभागात वाढलेले कामकाज पाहता चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापण्यास शासनाने सकारात्मकता दर्शविली आहे. पुणे जिल्ह्यात नागरीकरण, औद्योगीकरण वेगाने होत असल्याने प्रशासनाकडील कामकाजसुद्धा वाढले आहे.

जिल्ह्यात १३ तालुके असून, भौगोलिक विस्तारही मोठा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या कामासाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागते. त्यामुळे या दाव्यांच्या निकालासाठी वेळ लागत असल्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी पद स्थापन करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. जमिनीचे अकृषिक परवाने, जमीनविषयक दाव्यांची सुनावणी, गौणखनिज, पुर्नवसन विभाग, कुळकायदा शाखा आदी विभाग हे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत. या कामकाजाव्यतिरिक्त सातबारा संगणकीकरण, जिल्हा दौरा, विविध समित्यांच्या बैठका आदींमुळे जमीनविषयक दाव्यांवर वेळेत निर्णय होत नाही. त्यामुळे बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. बारामती अपर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या तालुक्यांचा समावेश होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ज्याप्रमाणे हवेली तालुक्यात तीन अपर तहसील कर्यालय आहेत. त्याच धर्तीवर खेड तालुक्यात आणखी एक अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबत शासन सकरात्मक आहे. चाकण येथे हे कार्यालय होणार असून, त्याअंतर्गत खेड तालुक्यातील निम्मी गावे या कार्यालयाशी जोडली जाण्याची शक्यता आहे.



# कलाकार कट्ट्याच्या स्थलांतराला राष्ट्रवादीचा तीव्र विरोध

पुणे : गुडलक चौकातील कलाकार कट्ट्याचे स्थलांतर करू नका, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना सोमवारी दिले. महापालिकेतील विरोधी पक्षनेते ड. निलेश निकम यांच्या नेतृत्त्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी पक्षाचे पालिकेतील गटनेते काका चव्हाण, नगरसेवक हर्षवर्धन मानकर उपस्थित होते.

राष्ट्रवादीने उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनाही निवेदन दिले आहे. गेल्या अनेक वर्षापासून कलाकार कट्टा हा नवोदित तसेच ज्येष्ठ कलाकारांच्या संवाद, सादरीकरण आणि विचारमंथनाचा महत्त्वाचा मंच राहिला आहे. शहरातील साहित्यिक, नाट्य, संगीत आणि विविध कला क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणणाऱ्या या ठिकाणाचे स्थलांतर करण्याऐवजी तो जतन करावा, अशी मागणी केल्याचे मानकर म्हणाले. पुण्याची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी कलाकार कट्टा स्थलांतरीत करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी अपेक्षा मानकर यांनी व्यक्त केली.

# आता 'या' ठिकाणी आंदोलनांवर बंदी! काँग्रेस भवन राड्यानंतर पोलीस आयुक्तांचा कडक निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

आंदोलनावेळी परिस्थिती चिघळून दगडफेक झाल्याने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी दोन्ही पक्षांवर कायदेशीर कारवाई केली असून दोषींवर कठोर कारवाई होईल. आयुक्त म्हणाले, पोलिसांना आंदोलन हिंसक होईल अशी पूर्वकल्पना नव्हती. दगडफेक, हिंसाचार होण्याची गुप्त माहिती आमच्याकडे नव्हती.

अशी माहिती असती तर परवानगी दिली नसती. आता राजकीय पक्षाच्या कार्यालयावर किंवा नेत्यांच्या निवासस्थानावर आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही. महापौरांच्या उपस्थितीत आंदोलन होऊनही त्यांच्यावर गुन्हा का दाखल केला नाही, या प्रश्नावर आयुक्त म्हमाले, पोलिसांकडे प्राप्त झालेल्या फिर्यादी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपासात जो दोषी आढळेल त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई होईल.काँग्रेस भवनवरील आंदोलन हिंसक होईल अशी कल्पना नव्हती. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जाणार आहे. अशा स्वरूपाच्या आंदोलनांना परवानगी दिली जाणार नाही. काँग्रेसकडून पोलिसांवर करण्यात आलेले आरोप फेटाळत आयुक्तांनी सांगितले की, पोलिसांनी नियमानुसार आणि कायद्यानुसारच कारवाई केली असून त्यांच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही. रविवारी काँग्रेस भवन परिसरात भारतीय जनता पक्षाच्या आंदोलनावेळी झालेली झटापट, तसेच दगडफेकीनंतर भाजप, काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल केल्या. त्यानुसार भाजप शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, तसेच काँग्रेस शहराध्यक्ष, नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ रविवारी भारतीय जनता पक्षाच्या झालेल्या आंदोलनावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट, दगडफेक झाली. यात काँग्रेसचे तीन, भाजपचे दोन, दोन पोलीस, दोन पत्रकार किरकोळ जखमी झाले. त्यानंतर रात्री उशीरा भाजप शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे,

युवा मोर्चाचे पदाधिकारी दुष्यंत मोहोळ यांच्यासह ५० ते ६० कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत काँग्रेसच्या कार्यकर्त्या प्राची दुधाणे ( ४२, रा. दुधाणेनगर, कर्वेनगर) यांनी फिर्याद दिली आहे.

# तळेगावात नूतन कॉलेज परिसरात प्लास्टिक पाइपांना आग

पिंपरी । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे येथे स्टेशन भागात नूतन अभियांत्रिकी जवळ रिकाम्या जागेवर ठेवलेल्या तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्याच्या



प्लास्टिकच्या पाइपांना आग लागण्याची घटना मंगळवारी (दि.१७) सायंकाळी सुमारे ५.१५वा. सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात भडकलेल्या आगीचे ज्वाळा आणि काळ्याकुट्ट धुराचे मोठे लोळ आकाशात उसळले.

अचानक लागलेल्या आगीमुळे आणि धुराच्या लोटामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घाबराट निर्माण झाली. आगीची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेवून तातडीने नगर परिषद अग्निशमन विभागाला कळवले. अग्नीशमन अधिकारी संतोष तेलगे आणि कर्मचारी निरंजन भेगडे,अनुपम सिंग,शुभम काळोखे,ओम भेगडे या अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी तातडीने धाव घेवून सुमारे अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली.यावेळी तेथील गवतासही आग लागली होती.आगीच्या घटनेस जबाबदार कोण अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकां मधून येत आहे. .या घटनेमागील कारणांचा तपास सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# समाविष्ट २३ गावांसाठी दोन हजार कोटींचे जागतिक बँक कर्ज; पाणी-सांडपाणी प्रकल्पांना गती

पुणे । प्रतिनिधी

जुलै २०२१ मध्ये महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी अखेर मोठा आर्थिक निर्णय घेण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, त्यासाठी प्राथमिक स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित गावांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याने या प्रक्रियेला वेग आला आहे.





राज्य सरकारने शहरालगतची २३ गावे जुलै २०२१ मध्ये पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. या समावेशनामागे नियोजनबद्ध विकास, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण, तसेच पाणी, सांडपाणी, रस्ते, पथदिवे, उद्याने, नाट्यगृहे आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, समावेशनानंतर विकास आराखडा तयार करण्याचे आणि बांधकाम परवानग्यांचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे देण्यात आले.

पीएमआरडीएने तयार केलेला आराखडा वादग्रास्त ठरल्याने तो रद्द करण्यात आला असून, बांधकाम परवानग्यांचे अधिकार अलीकडेच महापालिकेकडे परत आले आहेत. पाच वर्षे उलटूनही अंतिम विकास आराखडा तयार नसल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सुविधांचा अभाव असताना मिळकतकर वसूल केल्याची टीकाही केली जात आहे. २३ गावांपैकी १६ गावांच्या सांडपाणी व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेला गती मिळाली आहे. उर्वरित पूर्व भागातील वाघोली, लोहगाव, मांजरी, शेवाळवाडी, वडाचीवाडी, औताडवाडी, हंडेवाडी आणि पश्चिमेकडील बावधन या सात गावांसाठी स्वतंत्र सांडपाणी योजना आखण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, ३७८ किलोमीटर लांबीच्या सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, ४६ किलोमीटर मुख्य सांडपाणी वाहिनी तसेच ३१ किलोमीटर अतिरिक्त वाहिन्या उभारणे यांचा समावेश आहे. या योजनेसाठी निधी जागतिक बँकेमार्फत मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.समाविष्ट गावांमध्ये शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यासाठी जलवाहिन्या टाकणे, जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, पाण्याच्या टाक्या बांधणे आणि घरगुती मीटर बसविणे अशी कामे हाती घेतली जाणार आहेत. यासाठी पाच ते सहा पॅकेज तयार करण्यात आली आहेत. लोहगाव-वाघोली भागासाठी ३२३ कोटी रुपयांची निविदा काढून कामास सुरुवात झाली आहे. उर्वरित गावांतील प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव आहे.